रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८७ ▌अंक ६३ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

● कल्हेच्या जंगल परिसरात श्रीलंका वरुन आलेला ओडिके पक्षी आपल्या मोदी पिल्ला करता भक्ष्य पकडून आणत आहे
छाया - राजेश डांगळे

वृषीवल

रायगड, सोमवार दि. ७ ऑगस्ट २०२३

किंमत ४ ₹

साताऱ्याची आदिती स्वामी
तिरंदाजीत विश्वविजेती

पान ८ वर

आजचा अग्रलेख
न्यायामधील खोट

वेगळे व्हायचे होते तर आदळआपट कशाला

- रायगड राष्ट्रवादीत आता सामना रंगणार
- सुरेश लाडांचा तटकरेंना सवाल

। नेरळ । प्रतिनिधी ।

राज्यात अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे काही आमदार बाहेर पडले आणि वेगळी चूल मांडून सत्तेत सहभागी झाले. हे मागील महिन्यातील घटना असली तर रायगड जिल्ह्यात वेगळी चूल मांडण्याची प्रथा यापूर्वीच सुरू झाली होती. त्यामुळे त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चालले होते याची कल्पना मला होती,असा हल्लाबोल माजी आ. सुरेश लाड यांनी कर्जत येथे रविवारी केला. त्यांनी वेगळे

“ राज्य पातळीवर वेगळी चूल मांडली जात असताना आपल्या पक्षातील नेते त्यांना रसद पुरविणाऱ्या कार्यकर्त्यांना खतपाणी घालत होते. मी शांत होतो कारण जिल्ह्यात चाललेले राजकारण पाहत होतो आणि म्हणून शांत होतो.
- सुरेश लाड, माजी आमदार

“ माझ्या खांद्यावर पक्षाने बंदूक दिली आहे,ती चालवावी तशी पक्ष संघटना सक्षम करून पक्षाचा झेंडा फडकवत ठेवणार.
- सुरेश टोकरे, जिल्हाध्यक्ष

होण्याचा निर्णय घेतला आहे, त्यांनी आनंदाने वेगळे व्हावे पण भांडी आदळत आमच्यावर टीका करीत बाजूला जाण्याची गरज नव्हती असा रोखठोक सवालही त्यांनी खा.सुनील तटकरे यांना अप्रत्यक्षपणे विचारला.

कर्जत तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची कार्यकर्ता बैठकीस उपस्थित कार्यकर्त्यांसमोर बोलताना सुरेश लाड यांनी रायगडात टोकरे यांच्या पाठीशी ठामपणे राहून जिल्हा पिंजून काढण्याचे काम शरद पवार,जयंत पाटील यांना अध्यक्ष यांना शब्द दिला आहे असे सुरेश लाड यांनी जाहीर केले. र शरद पवार यांना मानणारे कार्यकर्ते किती आहेत हे पाहायचे होते म्हणून कोणालाही फोन केला नाही आणि ही गर्दी पाहून धन्य झालो अशी प्रतिक्रिया ●➤ पान २ वर

राज्यसभेत आज विरोधकांची परीक्षा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह सोमवारी (७ ऑगस्ट) 'गव्हर्नमेंट ऑफ नॅशनल कॅपिटल टेरिटरी ऑफ दिल्ली (सुधारणा) विधेयक, २०२३' राज्यसभेत सादर करणार आहेत. यापूर्वी ३ ऑगस्ट रोजी राजधानी दिल्लीतील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांमध्ये लेफ्टनंट गव्हर्नरचा निर्णय अंतिम ठरवणारे विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात आले आहे.

या विधेयकावर लोकसभेत झालेल्या साडेचार तासांच्या चर्चेला उत्तर देताना गृहमंत्री अमित शाहांनी विरोधकांना धारेवर धरले होते. विरोधकांना दिल्लीच्या हिताची चिंता नाही, तर युती वाचवण्याची चिंता आहे. आज विरोधकांना मणिपूर हिंसाचार का आठवत नाही, असा सवाल त्यांनी केला होता. आज पंतप्रधानांना सभागृहात बोलावण्याची मागणी विरोधक का करत नाहीत? याआधीही नऊ विधेयके मंजूर झाली असताना विरोधक चर्चेत का सहभागी झाले नाहीत? असेही अमित शाह म्हणाले होते.

वे|ध|क

युवकांच्या प्रसंगावधाने ज्येष्ठाचे वाचले प्राण

पाताळगंगा : आंबिवली, ता.खालापूर येथे विजेचा शॉक लागलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाला युवकांच्या प्रसंगावधाने जीवदा मिळाले विजेच्या खांबाच्या बाजुला एक वयोवृद्ध काम करीत होते. काही क्षणांत ते ओरडू लागले. तेथे उपस्थित असलेल्या सामाजिक कार्यकर्ते भगवान जाधव यांनी प्रसंगावधान राखत काठीने त्या नागरिकाचे प्राण वाचविले. यावेळी रमेश जाधव, रुपेश जाधव, सतिश जाधव, सुरेश शेरे, संतोष कांबळे, वैभव परांगे,अनिल जाधव, नामदेव जाधव, अरुण जाधव, दिक्षा जाधव आदी सहभागी झाले.

रेल्वे स्थानकांच्या विकासाचा प्रारंभ

नवी दिल्ली : रेल्वे मंत्रालयाने देशातील १ हजार ३०० रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्याचा निर्णय घेतला आहे. 'अमृत भारत' या योजनेअंतर्गत टप्प्या-टप्प्याने देशातील रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास केला जाणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी ५०८ रेल्वे स्थानकांच्या पुर्नविकासाच्या कामांची पायाभरणी केली. यामध्ये महाराष्ट्रातील ४४ स्थानकांचा समावेश आहे.

बेस्टच्या संपाने मुंबईकरांचे हाल

मुंबई : मुंबईतील बेस्ट कर्मचाऱ्यांचा संप सुरुच आहे. मुंबई बेस्ट परिवहन सेवेतील कंत्राटी कामगारांच्या संपाचा आज पाचवा दिवस आहे. बेस्ट कर्मचाऱ्यांनी बंद पुकारल्यामुळे मुंबईकरांचे मात्र हात होत आहेत. पगारवाढ आणि सुविधांच्या मागण्यांसाठी मुंबईत बेस्टमधील कंत्राटी कामगारांनी संप सुरु केला आहे. जोपर्यंत आपल्या मागणी पूर्ण होणार नाही तोपर्यंत हा संप सुरुच राहील, असा आक्रमक पवित्राही कर्मचाऱ्यांनी घेतला आहे.

क्रांतीकारी गायक गदर कालवश

हैदराबाद : तेलंगणातील प्रसिद्ध लोकगायक आणि

गीतकार गद्दर यांचे रविवारी निधन झालं आहे. क्रांतिकारी गीतांसाठी नावाजलेले गदर यांचं वयाच्या ७७ व्या वर्षी निधन झालं आहे. वास्तविक, त्यांचं खरं नाव हे गुम्मडी विठ्ठल राव असं होतं. पण, गद्दार म्हणून त्यांनी सर्वदूर आपली ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनाबद्दल साहित्य, कला क्षेत्रातून शोक प्रकट केला जात आहे.

जो भाजपसोबत येणार तो आमचाच : शाह

। पुणे । प्रतिनिधी ।

जो येणार तो आमचाच आहे. ज्यांच्याकडे टॅलेंट आहे त्यांना आम्ही सोबत घेणार आहोत.असे जाहीर करत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्रातील दोन्ही दरडींवर हात ठेवून बसलेल्यांना खुली ऑफरच देऊन टाकली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज पुणे दौऱ्यावर आहेत. पिंपरी चिंचवड येथे सहकार विभागाच्या पोर्टलचं उद्घाटन शाह यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दुसरे उपमुख्यमंत्री

अजित पवार यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना अमित शाह म्हणालेकी,मल्टिस्टेटको-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सहकार विभागाचे सचिव आणि त्यांच्या पथकाने अत्यंत कमी वेळेमध्ये हा

“ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह ॲक्टअंतर्गत निवडणूक व्यवस्थेमध्ये सुधार, को-ऑपरेटिव्ह गव्हर्नन्स, व्यापारी सुलभता आणि स्वतंत्र निवडणूक आयोग नेमण्यात आलेला आहे. आता कुणीही आपल्या पुतण्या-भावाला नोकरीला लावू शकणार नाही. बोर्ड चालवण्याच्या नियमांत मोठे बदल केला आहे.
- अमित शाह, केंद्रीय मंत्री

कायदा आमलात आणण्यासाठी कष्ट घेतले. २ तारखेला कायदा तयार झाला आणि ४ ला ●➤ पान २ वर

शाह भेटीचे वृत्त काल्पनिक

शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जंयत पाटील यांनी आज पुण्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याच्या चर्चांना उधाण आले होते. मात्र हे सारे काल्पनिक वृत्त असल्याचे त्यानी म्हटले आहे. एखाद्याबद्दल गैरसमज पसरवण्याचा उद्योग सुरू होणे योग्य नाही. काय झालं, काय नाही याचा अभ्यास बातमी देणाऱ्यांनी केला पाहिजे. माझी सकाळपासून या बातम्यांमुळे करमणूक होतेय, काल संध्याकाळी शरद पवार यांच्या घरी होतो. मग मी तिकडे कधी गेलो? मी त्यांना कधी भेटलो याचं संशोधन झालं पाहिजे, असे जयंत पाटील म्हणाले. माझ्याबाबतीत हेतुपुरस्सपणे बातम्या प्रसिद्ध केल्या जात आहेत हे अयोग्य असल्याचे त्यांनी सांगितले.

मैत्रीचे बंध...

● जागतिक मैत्री दिनानिमित्त अलिबाग येथे महाविद्यालयीन मुलांनी एकमेकांच्या हाताला फ्रेंडशिप बॅंड बांधून मैत्री दिनाच्या शुभेच्छा दिल्या. (छायाचित्र -समीर मालोदे)

जबरी चोरी प्रकरणी दोन आरोपींना अटक

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

कक्ष तीन गुन्हे शाखेकडून घरफोडी व जबरी चोरीच्या गुन्ह्यातील दोन आरोपींकडून बारा गुन्ह्यांची उकल करून गुन्हयातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर वस्तू असा एकूण बारा लाख सोळा हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सीबीडी बेलापूर पोलीस ठाणे हद्दीमध्ये २० जुलै रोजी अज्ञात इस्मानी घरफोडी करून रोख रक्कम, सोन्या चांदीचे दागिने, मोबाईल फोन व इतर वस्तू असा एकूण सात लाख पन्नास हजार रुपये किमतीचा

मुद्देमाल चोरी केला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखा कक्ष तीनने गुन्ह्याच्या घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. तसेच बातमीदारांकडून माहिती प्राप्त केली. तांत्रिक तपासा आधारे आरोपी हैदर अनारूल शेख व युसूफ नूर इस्लाम शेख यांना त्यांच्या गावी मुर्शिदाबाद, पश्चिम बंगाल या ठिकाणी रेल्वेने पळून जाण्याचा प्रयत्न करताना वर्धा रेल्वे स्टेशन येथे गीतांजली एक्सप्रेस मधून ताब्यात घेण्यात आले. त्यांनी नवी मुंबई व रेल्वे आयुक्तालय मुंबई मधील घरफोडी व जबरी चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली असून त्यांच्याकडून १२ गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे. आरोपींकडून सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यातील चार, सानपाडा तुर्भे पोलीस ठाण्यातील एक, कोपरखैरणे पोलीस ठाण्यातील दोन, पनवेल शहर पोलीस ठाण्यातील एक, एन आरआय ●➤ पान २ वर

रायगडची लालपरी गणेशोत्सवासाठी सज्ज

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

गणेशोत्सव अवघ्या ४० दिवसांवर येऊ ठेपला आहे. आता गणरायाच्या आगमनाचे वेध लागले आहे. बाप्पाचे स्वागत जल्लोषात करण्यासाठी प्रत्येकाने आपआपल्या परीने सजावटीचे नियोजन सुरू केले आहे. मुंबई, बोरीवली, ठाणेमधील चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी रायगडची लालपरी सज्ज झाली असून आतापर्यंत २५ एसटी बसेस फुल्ल झाल्याची माहिती एसटी महामंडळ रायगड विभागाकडून देण्यात आली आहे.

यंदा गणेशोत्सव १९ सप्टेंबरपासून सुरु होणार आहे. मुंबई, बोरीवली, ठाणे, पुणे या ठिकाणी नोकरीनिमित्त असलेले ●➤ पान २ वर

२५ एसटी बसेस फुल्ल

“ गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी येणाऱ्या व परतीच्या मार्गावर जाणाऱ्या प्रवाशांसाठी एसटी महामंडळ सज्ज आहे. गेल्या महिन्याभरापासून आरक्षण नोंदणी सुरु केली आहे. प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. प्रवाशांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा यासाठी नियोजन सुरु आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार, बस सेवा उपलब्ध करण्याचा प्रयत्न राहणार आहे.
– दीपक घोडे
विभाग नियंत्रक

मॉर्निंग वॉक बेतला जीवावर

। पनवेल । वार्ताहर ।

मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या ७३ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला भरधाव कारने धडक दिल्याने सदर ज्येष्ठ नागरिकाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना खारघर, सेक्टर- ३५ मध्ये घडली. खारघर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेल्या महिला कार चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मृत झालेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव नंदकुमार उग्रमोहन सिंग (७३) असे आहे.

ते खारघर सेक्टर- ३५ जी मधील अरिहंत अनाया सोसायटीत कुटुंबासह राहत होते. नंदकुमार सिंग बिहार पोलीसमधून रिटायर्ड झाले असून दोन महिन्यापूर्वीच ते पत्नीसह खारघरमध्ये मुलाकडे राहण्यास आले होते. दररोजप्रमाणे नंदकुमार सिंग सकाळी मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडले होते. नंदकुमार सेक्टर- ३५ ओवेगांव मधील मिष्ठान मिठाईच्या दुकानासमोरील ब्रीजवरुन चालत जात होते. यावेळी पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या टाटा पेच कारने त्यांना धडक दिली. या अपघातात नंदकुमार सिंग गंभीर जखमी झाल्याने त्यांना खारघर मधील आयुश हॉस्पीटल मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, ●➤ पान २ वर

उद्धर कातकरवाडीतील दोन घरे कोसळली

। सुधागड -पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील उद्धर कातकरवाडी येथील दोन घरे कोसळली आहेत. त्यामुळे येथील आदिवासींचा संसार उघड्यावर पडला आहे. येथील श्री रामेश्वर देवस्थान उद्धर व ग्रामस्थांतर्फे या लोकांना मदत मिळत आहे. मात्र शासनाकडून अजूनही कोणतीच मदत मिळालेली नाही. अनिल वाघमारे यांचे घर २९ जुलै रोजी पडले, तर काशीराम हिलम यांचे घर ७ जून रोजी पडले. इतके दिवस उलटून देखील अजूनही शासनातर्फे

या कुटुंबियांना कोणतीही प्राथमिक मदत मिळालेली नाही. मग उद्धर ग्रामस्थांनी श्री रामेश्वर देवस्थान कडून भांडी, कपडे, छत्र्या व टॉवेल या वस्तू ●➤ पान २ वर

✻ अखिल भारतीय राजज्योतिषी ✻

हनुमंताचे परमभक्त पंडितजी भारत भ्रमण करुन भक्तांच्या आग्रहास्तव अलिबागमध्ये

चेहरा, फोटो, हस्तरेखा पाहुन स्वामिजी भविष्य सांगतात, कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देतात. कोणत्याही प्रकारच्या संकटाचे स्वामीजी निवारण करतात. नोकरीत बढती, धंद्यात बरकत, प्रेम विवाह, प्रेम भंग, पुत्र-पुत्रींचे लग्न, धन प्राप्ती इ. ज्यांचा पंडितजी वरुन विश्वास उठलेला असेल, त्यांनी अवश्य स्वामिजींची मुलाखत घ्यावी. माता आणि भगिनी सुद्धा भेटू शकतात. प्रथम मुलाखतीत परिणाम, ज्यांची भावना शुद्ध असेल त्यांनीच भेटावे.

दि. ७/८/२०२३ ते १३/८/२०२३

रुम नं ११०, हॉटेल सागर, कर्वे वाडी, जेएसएम कॉलेजजवळ, अलिबाग

समस्या नाही असा मनुष्य नाही, उपाय नाही, अशी समस्या नाही

कोणत्याही कामाची गॅरंटी लिहून देतात / एकदा भेटून खात्री करा, अपॉईंटमेंट आवश्यक.

9111944784, 9111944982

नितीन देसाई आत्महत्या प्रकरण

वसुलीच्या तगाद्याने नवीन प्रकल्प थांबले

- कर्जदार कंपनीच्या आडमुठे धोरणाचा फटका
- नेहा देसाई यांच्या तक्रारीत उल्लेख

आविष्कार देसाई
रायगड :

कर्जाच्या बोजाखाली दबलेले असतानाही नितीन देसाई यांनी सुरु असलेल्या प्रकल्पांवर लक्ष केंद्रित केले होते. परंतु कंपनीकडून वसुलीसाठी सातत्याने तगादा लावण्यात येत होता. त्यामुळे सुरु असलेले प्रकल्पाचे काम बंद पडले, तर नवीन प्रकल्प येण्याचेही दरवाजे बंद झाल्याने तब्बल १०० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान नितीन देसाई यांना सोसावे लागले. असा सनसनाटी आरोप देसाई यांची पत्नी नेहा देसाई यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीतून पुढे आला आहे.

यामध्ये कंपनीचे अधिकारी आणि नेमलेल्या प्रशासकामुळेच एवढा मोठा आर्थिक फटका देसाई यांना बसला. घेतलेले कर्ज परत फेडू नये यासाठीच संबंधित वित्तीय कंपनी प्रयत्न करत होती. सदरचे कर्ज फेडले ●➤ पान २ वर

स्टुडिओतील जमिनींवर डोळा

एखाद्या कलाकाराचे कौशल्य हे त्याची कला असते. त्या कौशल्याच्याच जोरावर

नितीन देसाई यांनी कर्ज घेतले होते. त्यांना आत्मविश्वास होता की सदरचे कर्ज आपण फेडू शकतो. मात्र कर्ज फेडता येऊ नये यासाठी परिस्थिती निर्माण करण्यात आल्याचे नेहा यांनी दिलेल्या तक्रारीतून दिसून येते. देसाई यांनी एनडी स्टुडिओमधील जमीन तारण ठेवली होती. सदरची जमीन मुंबई-पुणे महामार्गावर होती. जमीन ही दर्शनी भागावरती असल्याने अशा जमिनींवर कोणत्या उद्योजकांचा डोळा असावा. ही जमीन घशात घालण्यासाठीचे प्रयत्न सुरु असल्याने देसाई हे व्यथित झाले होते. कर्ज देणाऱ्या कंपनीने याच दृष्टीने देसाई यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला की काय असा प्रश्न आता विचारला जात आहे. यामुळे याबाबत गुढ वाढले आहे.

वासांबे येथे विविध उपक्रमांचा प्रारंभ

रसायनी : वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदीप मुंढे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. नुकताच झालेल्या इर्शाळवाडी येथील दुर्घटनेमुळे संदीप मुंढे यांनी आपला वाढदिवस सालाबादप्रमाणे जल्लोषात न करता सामाजिक उपक्रम राबवून साध्या पध्दतीने साजरा केला.यावेळी टाकेदेवी रिक्षा चालकमालक संघटना यांच्या मोहोपाडा येथील नविन कार्यालयाचे उदघाटन, गुलमोहर सोसायटी व मृदुला रेसीडन्सी इमारत परिसरात सीसीटीव्ही कॅमऱ्याचे लोकार्पण, गुरूद्वारा ते एचडीएफसी बँक (सेबी रोड) पर्यंत रस्त्यालगत पथदिवे आदींचे लोकार्पणही यावेळी करण्यात आले.यावेळी सदर कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रेस क्लबतर्फे शेतकऱ्यांचा सन्मान

म्हसळा : म्हसळा प्रेस क्लबतर्फे शेतकऱ्यांचा सन्मान मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी करण्यात आला. यावेळी खा. सुनील तटकरे, समीर बनकर, बबन मनवे, महादेव पाटील, पोलीस निरीक्षक संदीपन सोनावणे, ज्येष्ठ पत्रकार संजय खांबेटे, सोनल घोले, किरण पालांडे, नाना सावंत, मधुकर गायकर, म्हसळा प्रेस क्लब अध्यक्ष बाबू शिर्के, चिटणीस महेश पवार, अशोक काते, उदय कळस, वैभव कळस अंकुश घाणेकर श्रीकांत बिरवाडकर यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

रहाटाड सरपंचासह ग्रामस्थ स्वगृही

तळा : तळा तालुक्यातील मौजे रहाटाड येथील सरपंच मिताली करंजे, सदस्य नियती नागे, रुक्मिणी मालुसरे व मराठाआळी ग्रामस्थ राष्ट्रवादीत स्वगृही परतले असून त्यांनी खा. सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. रहाटाड मराठाआळी येथील ग्रामस्थांनी काही महिन्यांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला होता. यावेळी नाना भौड, कैलास पायगुडे, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, जान्हवी शिंदे, नागेश लोखंडे, जगदीश शिंदे यांसह राष्ट्रवादीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वच्छ सुंदर नेरळ प्रतिमेला हरताळ

ग्रामपंचायत विरोधात नागरिक आक्रमक

। माथेरान । वार्ताहर ।

स्वच्छ, सुंदर नेरळ प्रतिमेला हरताळ फासला गेला असून,शहरातील अस्वच्छतेवरुन नागरिक ग्रामपंचायतीच्या विरोधात आक्रमक झाल्याचे चित्र दिसत आहे.

रेल्वे स्थानकाजवळच आजाद बेकरी येथील रस्ता हा रहदारीचा मार्ग आहे. येथूनच राजेंद्रगुरुनगर या नेरळमधील सगळ्यात मोठ्या गृहसंकुलात जाण्यासाठी देखील रस्ता आहे. त्यामुळे हा मार्ग कायम पादचारी यांच्याकडून व्यस्त असतो. मात्र गेले अनेक वर्षे हा रस्ता केलाच नसल्याने येथील रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. तर येथील नागरी वस्तीत रस्त्यावर गटाराचे पाणी साचले असून बाजूलाच कचऱ्याचा ढीग लागत असतो. तर हा कचरा उचलायला नेरळ ग्रामपंचायतीची गाडी येत नसल्याने त्यातून दुर्गंधी सुटून येथूल चालणाऱ्या नागरिकांचे नाक मुठीत धरून चालावे लागते. अनेकदा ग्रामपंचायतीला तक्रारी करून ग्रामपंचायत लक्ष देत नसल्याने येथील नागरिक आता आक्रमक होत रस्त्यावर आले आहेत. तसेच सुविधा मिळण्यासाठी आंदोलन करण्याची भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

नेरळ ही जिल्ह्यातील सगळ्यात मोठी ग्रामपंचायत आहे. आर्थिक आणि लोकसंख्येच्या दृष्टीने देखील नेरळ ग्रामपंचायतीचा कारभार मोठा आहे. येथील कर्मचारी संख्या देखील जास्त आहे. मध्य रेल्वेच्या उपनगरीय सेवेने नेरळ जोडले गेले आहे. त्यामुळे मागील काही काळात येथे नागरीकरण झपाट्याने होत आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार नेरळ शहराची लोकसंख्या १८ हजार ४२९ एवढी होती. परंतु सद्यस्थितीत झपाट्याने वाढत असलेला परिसर व वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सद्यस्थितीत नेरळची लोकसंख्या अंदाजे ४० ते ५० हजाराच्या आसपास जाऊन पोहोचली आहे. तर येथील गाव हा शहरीकरणाकडे झुकला असल्याने येथील नियोजनासाठी नेरळ संकुल विकास प्राधिकरणाची निर्मिती नगररचना विभागाने केली होती.असे असताना देखील सध्या नेरळ ग्रामपंचायतीला नाकापेक्षा मोती जड झाल्याचे चित्र आहे. नेरळ शहराच्या मध्यभागी असलेल्या नेरळ रेल्वे स्थानकाजवळ नेरळ येथील जुन्या आजाद बेकरी रस्ताची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. त्यामुळे या रस्त्यावरून चालणे नागरिकांना जोखमीचे झाले आहे. गेले अनेक वर्षे हा रस्ता बनवण्यात आलेला नाही. त्यामुळे परदेशी यांच्या घराजवळील मोरी फुटली आहे. तर पुढे कचऱ्याचे ढीग साठून राहत असल्याने कचऱ्याची मोठी दुर्गंधी सुटते. तसेच हिंस्र श्वान, कावळे यांची रेलचेल असल्याने लहान मुलांना चालणे जोखमीचे होत आहे. तसेच येथे सोनोग्राफी सेंटर आहे. त्यामुळे रुग्ण याठिकाणी येत असतात. मात्र येथून येण्याचा मार्ग हा अत्यंत निमुळता असल्याने आणि अवैध पार्किंगचा रस्त्याला विळखा पडत असल्याने रुग्णांना घेऊन येणाऱ्या रिक्षा यायला अडचण निर्माण होते.

याबाबत नेरळ ग्रामपंचायतीला अनेकदा सांगून सुद्धा आमचा विचार केला जात नाही. आता रस्ता, गटार, स्वच्छ परिसर या सुविधा ग्रामपंचायतीने आम्हाला दयाव्यात हा आमचा मूलभूत अधिकार आहे. अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा नागरिकांनी दिला आहे. तेव्हा आता ग्रामपंचायतीला जाग येणार कि नागरिकांना हक्कासाठी आंदोलन करावे लागणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

मोरबे धरणात ९१ टक्के पाणीसाठा

पावसाच्या ओढीने नियोजनावर भर

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबईकरांसाठी यंदा आनंदाची बातमी असून मोरबे धरण ९१ टक्क्यांपेक्षा अधिक भरले आहे. धरणात पुढील ३२० दिवस पुरेल एवढा पाणीसाठा झाला असून ५०० मिलीमीटर पाऊस पडल्यास मोरबे धरण शंभर टक्के भरेल. परंतु मोरबे परिसरात पावसाचे प्रमाण कमी राहिले तर शहराला पाणीपुरवठ्यासाठी दिवसाला लागणाऱ्या ४६५ दशलक्ष लीटर पाणी उपशामुळे मोरबे धरण भरण्यासाठी अधिक पावसाची आवश्यकता लागेल अशी स्थिती आहे.

जून महिन्यात पावसाने हात आखडता घेतला, परंतु जुलै महिन्यातील दमदार पावसामुळे धरणात चांगला जलसाठा उपलब्ध झाला आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात २३ जूनपर्यंत फक्त ३३ दिवस पाणीपुरवठा करता येईल एवढाच पाणीसाठा शिल्लक होता. परंतु मागील महिनाभरात मोरबे धरणाच्या व माथेरानच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाला असून मोरबे धरणात पुढील वर्षी २१ जून २०२४ पर्यंत नवी मुंबईकरांना सुरळीत पाणीपुरवठा करता येईल एवढा जलसाठा झाला आहे. यंदाच्या पावसाळ्यात माथेरानच्या डोंगररांगामध्ये काही दिवसांतच ४००० मिमीपेक्षा अधिक पाऊस पडला आहे. तर मोरबे धरण क्षेत्रात आतापर्यंत २७४१ मिमी. पाऊस पडला आहे.

नवी मुंबई मोरबे धरण परिसरात सव्वा महिन्यात तब्बल २७४१.८० मिमी. पावसाची नोंद झाली आहे. तर गेल्यावर्षी आतापर्यंत २११२ मिमी पावसाची नोंद झाली होती. मोरबे धरण हे ८८ मीटरला १०० टक्के भरते. धरणात गेल्यावर्षीच्या तुलनेत अधिक जलसाठा झाला आहे. परंतु मागील काही दिवसांपासून पावसाच्या विश्रांतीमुळे धरण भरणार का याकडे नवी मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

> मोरबे धरणात चांगला पाणीसाठा झाला असला तरी पावसाने उघडीप घेतली आहे. पुढील काही दिवसांतच ५०० मिमी पाऊस पडला तर धरण नक्की भरेल. धरणात चांगला पाणीसाठी निर्माण असला तरी वर्षभराच्या पाणीपुरवठ्याबाबत पालिका नियोजनबद्ध व योग्य ती खबरदारी घेत आहे.
> - संजय देसाई, शहर अभियंता

घरकाम करणाऱ्या महिलांचा सन्मान

। खोपोली । प्रतिनिधी ।

स्वामिनी प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा कांचन जाधव यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत घरकाम करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.आ.महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत या महिलांचा साडीचोळी देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अर्चना सुळ-नारनवर, पंकज पाटील, कुलदीपक शेंडे,राजू गायकवाड, सुवर्णा मोरे, केविना गायकवाड, प्रिया जाधव, बाबू पोटे, संदेश पाटील, तात्या रिठे, सुरेखा खेडकर,जेसेल निलेश पाटील, सारिका सावंत, राजेंद्र मांडे यांसह घरकाम करणाऱ्या महिला उपस्थित होते.सूत्रसंचालन जगदीश मराजगे यांनी केले.

अधिकारी, कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

। उरण । वार्ताहर ।

राज्यात महसूल सप्ताह सुरू आहे. या महसूल सप्ताहच्या अनुषंगाने अ तहसील कार्यालय उरण येथे अधिकारी व कर्मचारी यांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी तहसीलदार डॉ. उद्धव कदम उरण यांच्या विनंती नुसार उरण मेडीकल वेल्फेअर असोसिएशनचे डॉक्टर्स यांनी सहभाग घेतला होता. तहसीलदार उरण डॉ. उद्धव कदम यांच्यासह सर्व नायब तहसीलदार, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी शिपाई कोतवाल यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामधे रक्ततपासणी, ईसीजी आदी तपासण्या करण्यात आल्या. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मोरे, डॉ. सत्या ठाकरे आणि डॉ. घनश्याम पाटील यांनी तपासणीनंतर आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. या आरोग्य शिबिरामध्ये असोसिएशनचे डॉ. अजय कोळी, डॉ. अजय लहासे, डॉ. सपणा उतेकर, डॉ. दया परदेशी, डॉ. सविता डेरे, डॉ. वनिता पाटील यांनी आपले अमूल्य योगदान दिले. सदर शिबीरा मधे ६५ कर्मच्याऱ्यांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेलता

बोंबले कुटुंबाचे तटकरेंकडून सांत्वन

। तळा । वार्ताहर ।

महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोनसडे येथे बोंबले कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतली.सोनसडे येथील अंगणवाडी सेविका सुरेखा बोंबले यांची सून जान्हवी अनिकेत बोंबले यांचे प्रसूती दरम्यान उपचार घेत असताना बालिकेसह निधन झाले.अंगणवाडी सेविका सुरेखा बोंबले यांच्या मुलाचे अवघ्या दीड वर्षांपूर्वीच लग्न झाले होते.व त्यांच्या घरी आनंदाचे क्षण येणार तोच प्रसूती दरम्यान त्यांच्या सुनेचे व नातीचे निधन झाल्याने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. या घटनेची माहिती मिळताच रविवारी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोनसडे येथे बोंबले कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.याप्रसंगी त्यांच्या समवेत नाना भौड, चंद्रकांत रोडे, गीता जाधव, जान्हवी शिंदे,तहसीलदार स्वाती पाटील यांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

देवद येथील कार्यकर्ते ठाकरे गटात

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल ग्रामीण देवद येथील शेकडो महिला व पुरुषांनी रविवारी शिवसेना (ठाकरे) पक्षामध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी सर्वांचे स्वागत केले.

याप्रसंगी भरत पाटील, ज्ञानेश्वर बडे, संदीप तांडेल, दीपक घरत, बिपिन झुरे, विशाल भोईर, धनराज बडे, प्रमुख जयंत पाखरे, धनजंय पाटील, कल्पना पाटील, रेवती सकपाळ, सुजाता कदम, तनुजा झुरे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिरीष घरत यांनी या पक्षप्रवेशाने तालुक्यात ग्रामीण भागात ठाकरे गटाचे वर्चस्व वाढत चालले असून, आगामी काळात ते आणखी वाढेल, असा दावा केला.

उसरण धरणावर स्वच्छता मोहीम

रसायनी : उसरण धरणावर सावळे-देवळोली गावातील नवतरुणांनी साफसफाई करुन फ्रेंडशीप डे साजरा केला. धरणाच्या परिसरातील प्लास्टिक, कागदी ग्लास,डिश,पत्रावली, प्लास्टिक बाटल्या, काचेच्या बाटल्या उचलून साफसफाई केली. तरुणांच्या या उपक्रमाचे देवळोली ग्रामपंचायतीने आभार मानले .यामध्ये स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले प्रतिक पाटील, दर्शन गव्हाणकर, तेजस पाटील, जितेश पाटील, साई पाटील, प्रतिक पाटील, तुषार पाटील, भारत तांडेल, विशाल केदारी, योगेश केदारी यांनी सहभाग दर्शविला.

पान १ वरुन

वेगळे व्हायचे होते तर आदळआपट कशाला

देखील लाड यांनी व्यक्त केली. आता शांत बसून राहण्याची वेळ नाही तर आगामी काळात येणाऱ्या जिल्हा परिषद,नगरपरिषदा तसेच ग्रामपंचायत यांच्या निवडणुका मित्र पक्षाच्या बरोबरीने ८३ वर्षाच्या तरुण योध्याची राष्ट्रवादी काँग्रेस कशी आहे हे दाखवून देण्यासाठी कामाला लागायला हवे असे आवाहन तानाजी चव्हाण यांनी केले. टोकरे यांचा सत्कार करण्यात आला.

रायगडची लालपरी

बाप्पाच्या स्वागतासाठी खास सुट्टी काढून गावी येतात. गणेशोत्सवात गावी येणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा. एसटी बसेसची कमतरता जाणवू नये म्हणून एसटी महामंडळ विभागाने चाकरमान्यांची काळजी घेतली आहे.

यंदा बोरीवली, ठाणे, वसई, विरार, नालासोपारा एसटी बस स्थानकातून चाकरमान्यांना एसटी बस कोकणासह रायगड जिल्ह्यात घेऊन येणार आहे. तर परतीच्या मार्गासाठी रायगड जिल्ह्यातून एसटी बस चाकरमान्यांना एसटी बस घेऊन जाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पाच दिवसाच्या विसर्जनानंतर १०० हून अधिक एसटी बसेस पाठविण्याची तयारी केली आहे. मुंबई, ठाणे, बोरीवली, नालासोपारा, विरार, वसई येथे चाकरमान्यांना २४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत लाल परी घेऊन रायगडमधून जाणार आहे. परतीला जाण्यासाठी रायगडमधून सुमारे २५ एसटी बसेस फुल्ल झाल्या आहेत.

आरक्षणाची व्यवस्था उपलब्ध

गणेशोत्सवानिमित्त कोकणात, रायगड जिल्ह्यात येणाऱ्या व पुन्हा मुंबई, ठाणे, बोरीवलीमध्ये जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी एसटी सेवा सुरु केली जाणार आहे. प्रवाशांना सुखकर व आरामदायी प्रवास करता यावा यासाठी आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. २४ जुलैपासून जिल्ह्यातील एसटी बस आगारातील स्थानकात आरक्षण केंद्र सुरु केले असल्याची माहिती एसटी महामंडळ रायगड विभागाकडून देण्यात आली आहे.

प्रवाशांच्या सेवेसाठी दुरुस्ती व गस्त पथक

मुंबई, पालघर, बोरीवली, ठाणे, कल्याण येथील चाकरमान्यांच्या सेवेसाठी एसटीची व्यवस्था केली आहे. खड्ड्यांमुळे तसेच अन्य काही कारणांमुळे एसटीत बिघाड झाल्यास तातडीने सेवा देण्यासाठी पोलादपूर, सुकेळी, वाकण, माणगाव, रामवाडी या ठिकाणी दुरुस्ती व गस्त पथक तैनात असणार आहे. महाड-चिपळूण-पेण-खारपाडा-वाकणपर्यंत ही यंत्रणा असणार आहे. ठिकठिकाणी ब्रेक डाऊन वाहनाची देखील व्यवस्था केली जाणार आहे.

खास पनवेल ऑपरेशन

गणेशोत्सवात गावी येणारे व परतीच्या मार्गावर जाणाऱ्या चाकरमान्यांना वाहतूक कोंडीचा फटका बसू नये यासाठी एसटी महामंडळाच्या रायगड विभागामार्फत चाकरमान्यांसाठी खास पनवेल ऑपरेशन सुरु केले आहे. अलिबाग, पेण येथून जास्तीत जास्त पनवेलपर्यंत बसेस सोडण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

दोन घरे कोसळली

दिल्या आहेत. तसेच रविवारी (ता.६) दोन्ही कुटुंबांना पाच ते सहा हजाराचे जीवनावश्यक साहित्य वाटप केले आहे. असे ग्रामस्थ प्रमोद लांगी यांनी सांगितले. नुकसानग्रस्त कुटुंबांना शासनाकडून तातडीची मदत मिळणे आवश्यक होते. असे देखील प्रमोद लांगी यांनी सांगितले.

जो भाजपसोबत येणार तो आमचाच : शाह

लागू झाला.असे त्यानी सांगितले. सहकाराला गावागावात पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. सहकाराच्या ऑडिटची जबाबदारी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला देण्यात आलीय. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात, त्यांच्या मार्गदर्शनात सहकाराला वेगळ्या उंचीवर पोहोचवण्याचं काम करणार आहोतफ्र असा विश्वास शाह यांनी बोलून दाखवला.

दादा योग्य त्या ठिकाणी बसलात

मदादा उपमुख्यमंत्री झाल्यानंतर मी पहिल्यादा पुण्यात आलो आहे. मी पहिल्यांदा त्यांच्यासोबत व्यासपीठावर बसलो आहे. मी पवार यांना सांगू इच्छीतो की खूप काळानंतर तुम्ही योग्य ठिकाणी बसला आहात. तुमच्यासाठी हीच जागा योग्य होती, पण तुम्ही उशिर केलात,फ असं अमित शहा म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह फक्त हे दोघेच देशाचं नेतृत्व करू शकतात. त्यामुळे मी मोठा निर्णय घेतला. शाह हे गुजरातमधून येतात. पण, त्यांचं महाराष्ट्रावर जास्त प्रेम आहे. कारण, ते महाराष्ट्राचे जावई आहेत. प्रत्येक जावयाचे सासरवाडीवर जास्त प्रेम होत असते. महाराष्ट्र आणि गुजरात दोन्ही राज्य एकच होते. सहकार क्षेत्रात महाराष्ट्र आणि गुजरातचा इतिहास आणि वर्तमानकाळ गौरवशाली राहिला आहे.

अजित पवार,उपमुख्यमंत्री

दोन आरोपींना अटक

सागरी पोलीस ठाण्यातील एक, रबाळे पोलीस ठाण्यातील दोन आणि वडाळा रेल्वे पोलीस ठाण्यातील एक असे १२ गुन्हे उघडकीस आणण्यात आले.

अटक आरोपी हैदर शेख याच्यावर यापूर्वी चार गुन्हे दाखल आहेत. तर युसुफ नूर इस्लाम शेख याच्यावर यापूर्वी पाच गुन्हे दाखल आहेत. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी अनिल देवळे, सपोनी ईशान खरोटे व त्यांच्या पथकाने केली.

मॉर्निंग वॉक बेतला जीवावर

उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. कारचालक आरती राजभर (३३) या महिलेने निष्काळजीपणे भरधाव वेगात कार चालवून नेल्याने सदरचा अपघात झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे खारघर पोलिसांनी तिच्या विरोधात गुन्हा दाखल करुन पुढील कार्यवाहीला सुरुवात केली आहे.

१०० कोटींचे प्रकल्प रोखले

नाही तर, एनडी स्टुडिओचा ताबा संबंधित वित्तीय संस्थेकडे जाणार होता. ही जागा गिळंकृत करुन त्यांना या ठिकाणी खासगी व व्यावसायिक बांधकाम करायचा कुटील डाव होता. त्यामुळे त्याचा मानसिक ताण नितीन देसाई यांच्यावर आला असे नितीन देसाई यांच्या पत्नी नेहा देसाई यांनी पोलीसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. महाराणा प्रताप या वेबसीरीजचे काम देसाई यांना मिळाले होते. तसेच त्यांची अन्य कामे मिळवण्यासाठी धडपड सुरुच असणार परंतु देसाई यांची अडवणूक झाल्याचे त्यांच्या पत्नी नेहा यांनी तक्रारीत नमुद केले आहे. सुरु असलेले प्रकल्प बंद पडणे आणि नवीन प्रकल्प न आल्याने सुमारे १०० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान देसाई यांना झाले आहे.

नेहा नितीन देसाई : दरम्यान, प्रख्यात कला दिग्दर्शक नितीन देसाई यांच्या आत्महत्येप्रकरणी इसीएल फायनान्स कंपनी/एडलवाईज ग्रुपच्या संचालकांना रायगड पोलिसांनी नोटीस पाठवली आहे. विविध मद्द्यांवर संचालकांकडून माहिती मागवण्यात आली आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकतीपैकी ०.३०.८५ हे. आर. पॉ इतके क्षेत्र हे त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन १) भुपेश तानाजी पेमारे, २) अरुण परशुराम यादव यांनी दिनांक २४/७ /२३ रोजी मा. दुय्यम निबंधक कर्जत -२ दस्त क्र. ४०२२/२०२३ चे खरेदीखताचे दस्ताने विकत घेतलेले आहे. खालील परीशिष्टामधील १) भुपेश तानाजी पेमारे, २) अरुण परशुराम यादव यांनी खरेदीचे दस्ताने खरेदी केलेल्या ०.३०.८५ हे. आर. पॉ क्षेत्राची मिळकत माझे अशिल श्री. लक्ष्मी बाबूलाल गुप्ता यांनी कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल हे खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन

मौजे- गुढवण, ता. कर्जत, जि. रायगडयेथील जमीन मिळकत.

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार	
		हे.आर.पॉ.	रुपये	पैसे
६५	१५/ब	०-६१-७०	००	२१

वरील मिळकतीपैकी खरेदी देणार यांनी खरेदी खताने खरेदी केलेले ०.३०.८५ हे.आर. पॉ. इतके क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-

कार्यालयीन पत्ता :- मु. गुरुकृपा, जिल्हा परिषद, शाळा उक्रुळ शेजारी, पो. चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

ॲड. जयेश संभाजी म्हसे
दिनांक :- ७-०८-२०२३
मो.नं.९०२८९८२२७७
ई मेल- :adv.jayeshmhase@gmail.com

नि व ड क

खड्ड्यांना घातले हार

पनवेल : दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात पनवेल शहरातील रस्त्यांची अवस्था दयनीय झाली असून, रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते असे चित्र संपूर्ण पनवेल परिसरात दिसून येत आहे. पनवेल महानगरपालिकेच्या या गलथान कारभाराचा निषेध करण्यासाठी रविवारी पनवेल शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व युवासेनेकडून खड्ड्यांना हारफुले घालून विशेष सत्कार करून पनवेल महानगरपालिकेचा निषेध करण्यात आला. यावेळी शिवसेना कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शालेय साहित्याचे वाटप

पनवेल : सद्गुरू श्री साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने यांच्या ४८ व्या वर्षी पनवेल परिसरातील ६०० शालेय विद्यार्थ्यांना पनवेल रेल्वे स्टेशनजवळील साईबाबा मंदिरात रविवारी शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. श्री साई नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्ट, श्री साई नारायण बाबा आश्रम, श्री साई बाबा मंदिर पनवेल यांच्यावतीने यांच्या पनवेल परिसरातील गरीब व गरजू शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांसह शाळेचा गणवेश व दप्तरांचे वाटप करण्यात आले.

मैत्री दिन उत्साहात साजरा

पनवेल : कॉलोनी फोरमच्या सर्व समन्वयकांनी झुंबा सेशनचा मनोसोक्त आनंद लुटत मैत्री दिन साजरा केला. कामोठे कॉलोनी फोरमच्या वतीने सातत्याने कामोठे शहारातील नागरी समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातात. वर्षभर विविध उपक्रम, निषेध मोर्चे आणि आंदोलने राबविणाऱ्या समन्वयकांच्या निरोगी आरोग्यासाठी मैत्री दिनानिमित्त झुंबा सेशनचे आयोजन करण्यात आले होते. समन्वयकांनी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त असणे गरजेचे आहे. त्याच हेतूने कार्यक्रमाचे आयोजन करणत आले होते.

विद्यार्थ्यांची हिमोग्लोबीन चाचणी

पनवेल : अनेमियामुक्त भारत मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत भारत विकास परिषद पनवेल शाखेच्या वतीने दोन शाळांमध्ये हिमोग्लोबीन चाचणी करण्यात आली. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, १३१८ विद्यार्थ्यांची टेस्ट करण्यात आली. नवीन पनवेल येथील आ. क्रा. वासुदेव बळवंत फडके विद्यालय व के.आ. बांठीया या शाळेतील विद्यार्थिनी आणि महिला पालक यांच्यासाठी या चाचणी आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

पनवेलमध्ये तरुणाचे अपहरण

पनवेल : करंजाडे येथे राहणाऱ्या एका तरुणाचे तो घरी एकटा असताना कोणी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची तक्रार त्याच्या मोठ्या भावाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे. दिपककुमार शिवनाथ शहा, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फूट पाच इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट असून, अंगात लाल हाफ बाह्यांचा टीशर्ट व काळी जीन्स पॅन्ट घातलेली आहे. अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ०२२-२७४५२३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक किरण वाघ ९९७०१८९२९८ यांच्याशी संपर्क साधावा.

'मुद्रा' मुळे नवउद्योजकांना बळ

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

कोरोनामुळे बेरोजगाराची समस्या निर्माण झाली आहे. रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी जिल्ह्यातील बेरोजगार तरुण व्यवसायाकडे वळू लागले आहेत. या तरुणांना मुद्रा योजनेंतर्गत येणाऱ्या शिशू, किशोर व तरुण कर्ज योजनेला आधार मिळाला आहे. जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे व जिल्हा अग्रणी बँकेच्या पुढाकाराने एप्रिल ते जून या तीन महिन्यांच्या कालावधीत जिल्ह्यातील बँकांनी ८ हजार ९०० बेरोजागारांना व्यवसायासाठी ८९ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर झाले असून, त्यापैकी ८३ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात बँकांना यश आले आहे.

मागील दोन वर्षे कोरोनाने जिल्ह्यात थैमान घातले होते. कोरोनाला आटोक्यात आणण्यासाठी लॉकडाऊन घोषित करण्यात आले. या लॉकडाऊनचा फटका अनेकांना बसला. त्यामुळे अनेक व्यवसाय ठप्प झाले. नोकऱ्या गेल्याने रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला. त्याची झळ लहान-मोठ्या उद्योजकांसह मुंबई, पुणे अशा मोठ्या शहरांमध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त असलेल्या रायगड जिल्ह्यातील नागरिकांनाही बसला. लॉकडाऊन शिथील झाल्यानंतर पुन्हा नव्याने उभे राहण्यासाठी अनेक बेरोजगार तरुणांनी प्रयत्न सुरु ठेवले. शहरात नोकरी करण्यापेक्षा आपल्या कौशल्याचा उपयोग व्यवसायातून करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गावांमध्ये लहान-मोठे व्यवसाय सुरु करण्याची धडपड सुरू झाली. जिल्ह्यातील बँकांनीदेखील ग्राहकांपर्यंत पोहोचून त्यांना कर्ज देण्याचा प्रयत्न सुरु केला. जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी शिबीर घेऊन योजनांची माहिती देऊन व्यवसाय करण्यासाठी प्रेरित केले. त्याचा परिणाम रायगड जिल्ह्यात चांगल्या पद्धतीने दिसून येत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे व जिल्हा अग्रणी बँकेच्या पुढाकाराने एप्रिल ते जून या तीन महिन्यांच्या कालावधीत जिल्ह्यातील बँकांनी ८ हजार ९०० बेरोजागारांना व्यवसायासाठी कर्ज दिले आहे. मुद्रा योजनेंतर्गत लघु व सूक्ष्म व्यावसायिकांना बळकट करण्यासाठी शिशू, किशोर व तरुण कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनांच्या माध्यमातून ८९ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. ८३ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत करण्यात बँकांना यश आले आहे. त्यात शिशु कर्ज योजनेच्या माध्यमातून ६ हजार २६५ या लहान व्यावसायिकांना ५० हजार रुपयांपर्यंत २० कोटी ३६ लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले आहे. किशोर कर्ज योजनेच्या माध्यमातून पाच लाखापर्यंत दोन हजार २३८ मध्यम व्यावसायिकांना ३८ कोटी ५० लाख रुपयांचे कर्ज वितरीत केले आहे. तसेच तरुण कर्ज योजनेद्वारे मोठ्या ३९६ व्यावसायिकांना ३० कोटी ४० लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले आहे.

> स्टार स्वरोजगार प्रशिक्षण संस्थानमार्फत अलिबागमध्ये व्यावसायिक प्रशिक्षण घेतले. स्वतःचा व्यवसाय असावा, यासाठी बँक ऑफ इंडियामधून कर्ज मिळवले. त्यासाठी लागणारे आधारकार्ड, पॅनकार्ड, प्रोजेक्ट रिपोर्ट, बँक एनओसी या कागदपत्रांची पूर्तता केली. त्यानंतर अवघ्या दहा दिवसांत शिशू कर्ज योजनेत ५० हजारांचे कर्ज मिळाले. थंड पेय व आयस्क्रीमचे दुकान सुरू केले. या योजनेने दिलेल्या आर्थिक बळावर मी आज स्वतःचा व्यवसाय यशस्वीपणे उभारु शकलो.
> - निलेश पाटील, व्यावसायिक, नागाव

- **आतापर्यंत ८९ कोटींचे कर्ज मंजूर**
- **८३ कोटी रुपये कर्जाचे वितरण**

> रायगड जिल्ह्यात मुद्रा योजनेंतर्गत येणाऱ्या वेगवेगळ्या योजनेंतर्गत हजारो व्यावसायिकांना कर्ज वितरीत केले आहे. मुद्रा योजनेसह अन्य योजनांमार्फत मिळणाऱ्या कर्जाचा नागरिकांनी लाभ घ्यावा. जिल्ह्यातील बँका नेहमी व्यावसायिकांना उभारी देण्याचा प्रयत्न करीत आहे.
> - विजय कुलकर्णी, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक, बँक ऑफ इंडिया

कर्ज योजनेमुळे हक्काचा आधार

शिशु कर्ज योजनेच्या माध्यमातून ६ हजार २६५ या लहान व्यावसायिकांना ५० हजार रुपयांपर्यंत २० कोटी ३६ लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले आहे. किशोर कर्ज योजनेच्या माध्यमातून पाच लाखापर्यंत दोन हजार २३८ मध्यम व्यावसायिकांना ३८ कोटी ५० लाख रुपयांचे कर्ज वितरीत केले आहे. तसेच तरुण कर्ज योजनेद्वारे मोठ्या ३९६ व्यावसायिकांना ३० कोटी ४० लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले आहे.

मुरुडमध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढला

- **नगरपरिषदेकडून डास निर्मूलन फवारणी नाही**
- **नागरिकांचे आरोग्य धोक्यात**

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड शहरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, प्रतिबंधात्मक कोणतीही फवारणी मुरुड नगरपरिषदेकडून करण्यात आलेली नाही. आरोग्य विभागाचे दुर्लक्षित कारभारामुळे नागरिकांना डासांचा उपद्रव सहन करावा लागत आहे. डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे आजार पसरण्याची भीती असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत.

सबनीस आळी, नवापाड कोळीवाडा, जुनापाडा कोळीवाडा, कुंभारवाडा, गणेश आळी बाजारपेठ आदी विविध भागात नगरपरिषदेने दरवर्षी करण्यात येणारी डास निर्मूलन फवारणी देखील केलेली नाही, अशी माहिती मुरूडचे माजी तहसीलदार नयन कर्णिक, शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते बाळकृष्ण गोंजी, जयश्री विलास जोशी, विलास जोशी, अभय जोशी, अशोक कमाने, आदेश दांडेकर, मनोहर बैले, रोहित खोत, संदेश नाईक यांनी दिली आहे. मुरूड शहरात नारळी-सुपारी बागायत क्षेत्र भरपूर आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असला तरी त्याआधी आणि नंतर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने प्रभावी डास प्रतिबंधक फवारणी करणे फार महत्त्वाचे आहे, असे मत नागरिकांनी व्यक्त केले.

लक्ष्मीखार भागात काही दिवसांपूर्वी करण्यात आलेली डास प्रतिबंधक फवारणी परिणामकारक नसल्याचे लक्ष्मीखार येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक कमाने यांनी सांगितले. डासांचा प्रचंड उपद्रव वाढल्याने नागरिक हैराण झाले आहेत. यामुळे शहरात थंडी, ताप, सर्दी, टॉयफाइड या रोगाची साथ पसरली असून, दवाखान्यातून रुग्णाची संख्या वाढती आहे. यामुळे नगरपरिषदेने त्वरित प्रभावी प्रतिबंधक फवारणी करावी, अशी मागणी मुरुडकर करीत आहेत.

यासंदर्भात मुरूड नगरपरिषदेचे आरोग्य निरीक्षक राकेश पाटील यांच्याशी शनिवारी सायंकाळी संपर्क केला असता, ते म्हणाले शहरात डास प्रतिबंधक फवारणी करण्याचे काम सुरू केले होते; परंतु आठ दिवसांपूर्वी पडलेल्या पावसामुळे फवारणी बंद करण्यात आली. ती चालू करू; परंतु, प्रत्यक्षात गेल्या कित्येक दिवसांत सर्व शहरात डास प्रतिबंधक फवारणी मोहीम राबविण्यात आली नसल्याचे नागरिकांतून सांगण्यात आले. तरी, नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी, असे सांगण्यात येत आहे.

● बालग्राम प्रकल्पातील बालकांनी पुन्हा तळीये, इर्शाळवाडीसारख्या घटना नको यासाठी 'पर्यावरण वाचवा, पृथ्वी वाचवा' हा संदेश स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर दिला आहे. त्यासाठी माळरानावरुन वृक्षदिंडी काढण्यात आली होती. (छायाचित्र : राजेश डांगळे)

स्थानिक मूर्तीकारांचा धंदा अडचणीत

बाहेरून येणाऱ्या गणेशमूर्तींचा व्यवसायावर परिणाम

। पनवेल । वार्ताहर ।

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चार ते पाच महिने आधीच मूर्तीकारांची लगबग सुरु होते. मात्र, बाजारात सध्या पनवेल शहराबाहेरुन तयार मूर्ती विक्रीसाठी येत असल्याने येथील स्थानिक मूर्तीकारांचे ग्राहक वर्षागणिक रोडवत चालले आहेत. त्यामुळे पनवेलमधील स्थानिक मूर्तीकारांचा व्यवसाय अडचणीत आला आहे.

पूर्वीपासून येथील स्थानिक मूर्तीकार मूर्ती बनवत आले आहेत. मात्र, मागील काही वर्षांपासून बाजारात तयार मूर्ती विक्रीसाठी येत आहेत. या मूर्ती पेण येथील कारखान्यात तयार होत असतात. या मूर्ती सहज उपलब्ध होत असल्याने पनवेल शहरात आज जागोजागी गणेशमूर्ती विक्री केंद्रे उभी राहात आहेत. मात्र, तयार मूर्ती विक्री केंद्रामुळे स्थानिक मूर्तीकारांना नवीन ग्राहक मिळत नसल्याने त्यांची मदार फक्त जुन्याच ग्राहकांवर अवलंबून असून, त्यातही आता घट होत चालली आहे. परिणामी, तयार मूर्तींमुळे पनवेल शहरातील स्थानिक मूर्तीकारांच्या व्यवसायावर मोठा परिणाम होत असल्याने स्थानिक मूर्तीकार आज अखेरची घटका मोजत आहे.

रिक्षाचालकाने केली मारहाण

पनवेल : परराज्यातून नोकरी-धंद्या निमित्ताने पोट भरण्यासाठी आलेल्या कामगारांना पनवेल बस स्थानकासमोर एका रिक्षाचालकाने मारहाण केल्याची घटना घडल्याने अश्या कामगारांमध्ये भीतीयुक्त वातावरण आहे.

योगेंद्र मिश्रा (२२, रा. पनवेल) याच्यासह त्याचा सहकारी कपिल सिंग हे तळोजे येथून पनवेल एसटी बस स्थानक या ठिकाणी रिक्षातून आले. यावेळी रिक्षाचालकाने त्यांच्याकडे भाडे मागितले मात्र भाडे देण्यास थोडा उशीर झाल्याने त्याचा राग मनात धरून रिक्षाचालकाने या दोघांना शिवीगाळ करून हाताबुक्क्याने मारहाण केली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अलिबागच्या शिक्षकांचा पुढाकार

मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी राबविली वक्तृत्व स्पर्धा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अलिबागच्या शिक्षकांनी वक्तृत्व स्पर्धा राबवून पुढाकार घेतल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे. प्राथमिक शिक्षक संघ उपशाखा अलिबागच्या संकल्पनेतून हा उपक्रम शनिवारी राबविण्यात आला. या उपक्रमामध्ये तालुक्यातील १५ केंद्रांतून ९० विद्यार्थी या सहभागी झाले.

रायगड जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त स्पर्धेच्या युगात टिकून ठेवण्यासाठी शिक्षक प्रमोद भोपी यांनी पुढाकार घेत अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील मुलांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या उपक्रमाला तालुक्यातील शिक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. तालुक्यातील कुरुळ येथे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. मराठीसह इंग्रजी माध्यमातून घेण्यात आलेली ही स्पर्धा तीन गटात घेण्यात आली. असंख्य विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन आपल्यातील कलागुणांचे सादरीकरण केले. या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत झाला.

यावेळी गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, तालुका अध्यक्ष प्रमोद भोपी, विनोद कवळे, सुनील पाटील, अजित हरवडे, निलेश वारगे, नित्यनाथ म्हात्रे, विनायक भोनकर, उमेश ठाकूर आदी शिक्षक उपस्थित होते.

या स्पर्धेचे औचित्य साधून प्रियांका पिंगळा हिचा इंजिनिअरची पदवी मिळवल्याबद्दल, तसेच सेवानिवृत्त शिक्षक विलास पाटील यांचादेखील सत्कार करण्यात आला. यावेळी गट शिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हात्रे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

अलिबागमध्ये रक्तदान शिबीर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

कच्छ युवक संघ अलिबाग, लायन्स क्लब अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील कच्छी भवन येथे रविवार, दि. ६ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.

जिल्हा रुग्णालयात वेगवेगळ्या रुग्णांना रक्तांची गरज निर्माण होते. अपघातग्रस्त अथवा अन्य रुग्णांना रक्ताची मदत तातडीने व्हावी, त्यांना रक्ताचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी अलिबागमधील कच्छ युवर संघाने सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानाचा उपक्रम हाती घेतला. सुरुवातीला रुपाली मगर, समिक्षा भगत, ओमकार घरत, निकेश पाटील, विराज कडपे यांनी रक्तदान करून साामाजिक बांधिलकी जपली. त्यानंतर मोठ्या संख्येने रक्तदाते रक्तदानासाठी पुढे आले. एकूण १०० पेक्षा अधिक रकतदात्यांनी रक्तदान केले. या शिबिरानिमित्त मधुमेह, रक्तदाब, नेत्र तपासणी करण्यात आली. पिवळ्या शिधापत्रिकाधारकांना मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे आयोजन करण्यात आले. कच्छ युवक संघाच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

रासायनिक पाण्याने बकऱ्यांचा बळी

। पनवेल । वार्ताहर ।

तालुक्यातील तळोजा औद्योगिकवसाहतीमधून वाहणाऱ्या कासाडी नदीमध्ये रासायनिक पाणी सोडल्यामुळे नावडा येथील शेतकऱ्याच्या ८ बकऱ्या दगावल्या आहेत, अशी माहिती माजी नगरसेवक तसेच रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरविंद म्हात्रे यांनी दिली आहे. नावडे गावातील बुधा अनंता म्हात्रे या शेतकऱ्याच्या या बकऱ्या होत्या. कासाडी नदीच्या प्रदूषणाबाबत अरविंद म्हात्रे हे न्यायालयीन लढा लढत आहेत. प्रदूषणाबाबत आठ जुलै रोजी त्यांनी ईमेल केले होते, जर योग्य कारवाई झाली असती तर शेतकऱ्याच्या बकऱ्या मरण पावल्या नसत्या, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

नांदगाव शाळेला गळती, विद्यार्थ्यांचे हाल

गळक्या छताखाली शिक्षणाचे धडे

। नेरळ । प्रतिनिधी ।

मराठी शाळा टिकाव्यात, गुणवत्ता वाढावी अन् मुलांची संख्याही वाढावी, याकरिता शासनाने पुढाकार घेतला. मात्र, जिल्हा परिषदेच्या कर्जत तालुक्यातील नांदगाव शाळेला अनेक वर्षांपासून गळती लागली आहे. अशा परिस्थितीत मुलांना शिक्षण घ्यावे लागत आहे. याबाबत ग्रामपंचायत प्रशासन, स्थानिक शालेय व्यवस्थापन, मुख्याध्यापक यांनी वारंवार कर्जत पंचायत समिती, सर्व शिक्षा अभियान तसेच शिक्षण विभागाकडे अर्ज केले आहेत. तरीही संबंधित अधिकाऱ्यांनी या शाळेला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली नसल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.

कर्जत तालुक्यातील नांदगाव ग्रामपंचायतीमधील नांदगाव येथील रायगड जिल्हा परिषदेची शाळा गळकी बनली आहे. षटकोनी पद्धतीत एकच इमारत असून, पहिली ते आठवीपर्यंत वर्ग असलेली शाळा आहे. त्या ठिकाणी सर्व शिक्षा अभियानामधून २०१२ मध्ये बांधलेली षटकोनी इमारती बहुसंख्य ठिकाणी गळक्या निघाल्या आणि त्यामुळे षटकोनी आकाराच्या बहुसंख्य शाळा इमारती या बंद आणि कालबाह्य झाल्या आहेत. मात्र, नांदगाव येथील शाळेची इमारत अनेक वर्षे पावसाळ्यात गळकी असूनदेखील तेथे जिल्हा परिषदेने नवीन वर्गखोल्या बांधून दिलेल्या नाहीत. त्यामुळे तेथील विद्यार्थी हे पावसाळ्यात आपल्या अंगाखांद्यावर आणि पुस्तकांवर पावसाच्या पाण्याचे पडणारे थेंब यांच्यामध्ये बसून शिक्षण घेत आहेत. मात्र, त्याबाबत ग्रामपंचायत प्रशासन तसेच स्थानिक शालेय व्यवस्थापन समिती तसेच मुख्याध्यापक यांच्या अर्जांवर कोणतीही कार्यवाही कर्जत पंचायत समिती, सर्व शिक्षा अभियान तसेच शिक्षण विभागाने केलेली नाही.

या शाळेमध्ये ८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हा परिसर महाराष्ट्र शासनाने आदिवासी जाहीर केला आहे. या परिसरात विकासकामे करण्यासाठी आदिवासी विकास विभाग तसेच शासनाचे अन्य सर्व प्रकारचे अतिरिक्त निधी मिळत असतात. मात्र, नांदगाव येथील शाळेची इमारत दहा वर्षांपासून पाण्याची गळती सुरु असतानादेखील त्याकडे शिक्षण विभागाने केलेले दुर्लक्ष निश्चितच सर्व यंत्रणेला विचार करायला लावणारे आहे. मात्र, आता स्थानिक ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे मागणी केल्याने ग्रामपंचायतीकडून त्या शाळेच्या इमारतीला प्लास्टिक आवरण टाकण्याचे काम सुरु केले आहे. हे सर्व गेली दहा वर्षे सुरु असूनदेखील त्यावर तोडगा काढण्यात आलेला नाही.

श्रीवर्धनमध्ये स्वच्छतेतून वाट मोकळी

। दिघी । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यातील नागलोली ग्रुप ग्रामपंचायतीच्या सात गावांनी मिळून स्वच्छता मोहीम राबवली आहे. धनगरमलई मुख्य मार्गावर झाडे झुडपांचे पसरलेले साम्राज्य दूर करून रस्ता सुस्थितीत केला आहे. या स्वच्छतेतून रहदारीचा मार्ग आता मोकळा केला आहे.

पावसाळ्यात रस्त्यालगतची झाडे झुडुपे वाढल्याने अपघाताची शक्यता होती. या गंभीर विषयाकडे लक्ष वेधून स्वच्छतेसाठी सात गावांनी सर्वानुमते निश्चय करत पुढाकार घेतला.

रस्त्याच्या दोन्ही बाजूस काटेरी झुडपांची वाढ असल्याने प्रवास करताना प्रचंड त्रास होत होता. त्यामुळे सरपंच विजय पाडावे व उपसरपंच मीलन काते यांनी स्वच्छतेची मोहीम राबवली आहे. या उपक्रमात नागलोली परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

न्यायामधील खोट

राहुल गांधींना त्यांची खासदारकी परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्व चोरांची नावे मोदी कशी असतात असे म्हटल्यावरून त्यांना दोन वर्षांची शिक्षा झाली होती. पण सर्वोच्च न्यायालयाने या शिक्षेला स्थगिती देत असतानाच अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. गुजरातमधल्या सुरतच्या कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निकालपत्राचे वाभाडेही काढले आहेत. बदनामीच्या खटल्यामध्ये दोन वर्षे ही सर्वाधिक शिक्षा आहे. राहुल यांना ती का देण्यात आली याचे कोणतेही कारण या निकालपत्रात नाही असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे. दोन वर्षे किंवा त्याहून अधिक तुरुंगवासाची शिक्षा झालेल्यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द ठरवण्याचा नियम आहे. म्हणजेच, ही शिक्षा दोन वर्षांहून एक दिवस जरी कमी असती तरी त्यांची खासदारकी गेली नसती. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रात मुद्दाम याचा उल्लेख केला आहे. आजवर विरोधी पक्षांनी याच मुद्द्यावरून टीका व आक्षेप नोंदवले होते. ते विरोधी पक्षांचे राजकारण आहे असे म्हणणे आजपर्यंत शक्य होते. आता मात्र खुद्द न्यायालयाने त्याविषयी शंका व्यक्त केली असल्याने कनिष्ठ न्यायालयाचा निकाल ते लोकसभा अध्यक्षांनी केलेली घाई यामागे भाजपचे राजकारण होते या संशयाला बळकटी मिळणार आहे. अर्थात असल्या संशयामुळे भाजपची आणि त्याच्या भक्तांची जाड कातडी थरथरणार देखील नाही हेही तितकेच खरे आहे. मात्र शुक्रवारच्या निर्णयामुळे राहुल यांचा लोकसभेत परतण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आता ते मोदी यांच्याविरुध्दची आपली लढाई अधिक जोराने लढू शकतील. कारण, लोकसभेत त्यांच्या बोलण्याला अधिक संरक्षण मिळेल. राफेल असो की अदानी, या सर्व प्रकरणांमध्ये राहुल यांनीच निर्भीडपणे मोदींवर हल्ला केला होता. या दोन्ही मुद्द्यांवर मोदी यांनी थेट उत्तरे देण्याचे टाळले आहे. अदानीबाबतचे मोदींचे मौन हे तर अधिक जाणवणारे आहे. तीच बाब सध्याच्या मणिपूर प्रश्नाबाबतही आहे. राहुल यांची खासदारकी जाताच त्यांना बंगलाही खाली करायला लावला होता. त्यांनीही तो तात्काळ केला होता. यातून त्यांची लोकप्रियता वाढलीच होती. विरोधी पक्ष अधिक एकवटण्यालाही मदत झाली. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने गुजरात उच्च न्यायालयावरही अप्रत्यक्षपणे ताशेरे मारले आहेत. अपिलाच्या सुनावणीच्या वेळी उच्च न्यायालयाने सुरत न्यायालयाच्या निकालाची चिकित्सा करणे अपेक्षित होते. पानेच्या पाने भरून निकालपत्र दिले आहे, पण त्यात निकालाचे कारण शोधलेले नाही हे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे. एकूणच आपल्या न्याययंत्रणेतील त्रुटींवर प्रकाश टाकणारी ही सर्व घटना साखळी आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील आज राहुल यांना न्याय दिला आहे. मात्र उद्या अंतिम निकालात काय भूमिका घेतली जाईल हे कोणीच सांगू शकत नाही. कायद्याचा अर्थ वेगवेगळा लावला जाऊ शकतो. उच्च न्यायालयाच्या निकालपत्रात अशी खोट निघावी व ते सर्वोच्च न्यायालयाला दाखवून द्यावे लागावे हे चिंताजनक आहे.

मरगळलेला विरोध

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या आधी अजित पवारांचे बंड झाले. त्यामुळे विरोधक काहीसे मरगळलेले असणार हे उघड होतं. तरीही काँग्रेसने बऱ्याच प्रमाणात आक्रमकता दाखवून कसर भरून काढली. संभाजी भिडेंच्या गुन्हेगारी स्वरुपाच्या वक्तव्यांविरुध्द पृथ्वीराज चव्हाण व बाळासाहेब थोरात यांनी प्रहार केले. पण भिडे यांना अटक करण्यास मात्र ते भाग पाडू शकले नाहीत. भिडे यांच्याविरुध्दचे आरोप तपासून घेऊ हेच सरकार पुन्हा पुन्हा सांगत राहिले. शेवटी तर भिडे यांच्या सभेचा पुरावाच उपलब्ध नाही असेही सांगितले गेले. थोडक्यात विरोधकांना न जुमानता वाटेल तसा कारभार करता येऊ शकतो हे आता शिंदे-फडणवीस-पवार यांच्या सरकारला कळून चुकलेले आहे. विधानसभेचा विरोधी पक्षनेता ठरवण्यात काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी अक्षम्य दिरंगाई केली. विजय वडेट्टीवारांची निवड अगदी अखेरीला झाल्याने ते काहीच प्रभाव टाकू शकले नाहीत. वडेट्टीवार हे मूळचे शिवसेनेचे. नारायण राणे यांच्यासोबत ते काँग्रेसमध्ये आले. त्यांच्या पदासाठी भोरचे संग्राम थोपटे इच्छुक होते. आता त्यांना न्याय द्यायला तयार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्याने सत्यजित तांबे यांची नवी आवृत्ती पाहायला मिळते की काय असे वाटू लागले आहे. दुसरीकडे शरद पवार गटाचे जयंत पाटील व जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधाची धार यावेळी एकदम बोथट झालेली दिसली. नरेंद्र मोदींना शरद पवार यांच्याच हस्ते टिळक पुरस्कार दिला गेल्याने राष्ट्रवादीच्या मागे राहिलेल्या गटात संभ्रमाचे वातावरण तयार झाले आहे. त्याचे स्पष्ट प्रत्यंतर या अधिवेशनात आले. विधानपरिषदेत शेकापचे भाई जयंत पाटील यांच्यासारख्यांचा अपवाद वगळता विरोधी बाकांवरून कोणी बोलणारेच उरलेले नाही. नीलम गोऱ्हे यांनी विधानभवनात केलेला शिंदे गटात प्रवेश हा आक्षेपार्ह होता. त्याला अनुषंगून पाटील यांनी सरकारला खिंडीत पकडले. पण त्यांना साथ देणारे कोणी नसल्याने अखेर गोऱ्हे यांच्याविरुध्द पूर्वी अविश्वासाचा ठराव दिलेल्या प्रवीण दरेकर यांनीच त्यांच्यावर विश्वास व्यक्त करणारा ठराव मांडला. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ४१ हजार कोटींच्या पुरवण्या मागण्या मंजूर करून घेऊन सरकारने बाजी मारली. शिवाय, आमदारांना भरपेट निधीचे वाटप करून टाकून नाराजांना खूष करून टाकले. त्यामुळे भरत गोगावले व इतरांचे ताबूत थंड झाले. रायगडसह अन्य जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदातही तूर्तास तरी बदल होणार नाही असे दिसते. मध्यंतरी अजित पवार मुख्यमंत्री होणार या चर्चेने बरीच उचल खाल्ली होती. पण एकनाथ शिंदे हे दिल्लीत सहकुटुंब जाऊन मोदी व अमित शाह यांना भेटून आल्यापासून एकदम जोरात आहेत. अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना शिंदे यांनी सेनेप्रमाणेच अजितदादांच्या समर्थकांवरही अप्रत्यक्ष टीका केली. या दरम्यान अजितदादा व शरद पवार यापैकी कोणाच्या गटात किती आमदार आहेत हे अजूनही स्पष्ट झालेले नाही. दोन्ही गटांची आरोपबाजीही थांबली आहे. आता आमदारांच्या अपात्रतेबाबत अध्यक्ष निर्णय देतील तेव्हाच बदलले तर राजकारण बदलेल.

विचार

कर्नाटकमध्ये अस्थिरतेचे ढग?

धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते एच. डी. कुमारस्वामी आणि भाजप नेते बी. एस. येडियुरप्पा यांनी कर्नाटकमध्ये सत्ताबदलाची शक्यता वर्तवली. मात्र भाजपचे ६६ आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे १९ आमदार एकत्र येऊन काँग्रेसचे सरकार पडू शकत नाही. अर्थात आपली कामे होत नसल्याची तक्रार पक्षाकडे करणाऱ्या काँग्रेस आमदारांची संख्या तीसच्या घरात असल्यामुळे कर्नाटकमध्ये एखादे वादळ येऊ घातले आहे का, हे तपासून पहावे लागेल.

सुदर्शन राव

कर्नाटकमध्ये गेल्या अनेक वर्षांनंतर प्रथमच बहुमत मिळून एखादा राजकीय पक्ष सत्तेवर आला आहे. असे असताना हे सरकार जास्त वेगाने काम करेल, अशी अपेक्षा असायला हवी. भारतीय जनता पक्षाच्या नकारात्मक कामगिरीच्या जोरावर सत्तेत आलेल्या काँग्रेसने निवडणुकीमध्ये लोकानुनयाच्या भरपूर घोषणा केल्या होत्या; परंतु आता त्या प्रत्यक्षात आणताना सरकारची कसरत होत आहे. त्यातच सरकार सत्तेत आल्यानंतर काही दिवसांमध्येच माजी मुख्यमंत्री कुमारस्वामी यांनी हे सरकार लवकरच कोसळेल, असे भाकीत केले. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जशी फूट पडली, तशी फूट पडेल, अशी भविष्यवाणीही केली. काँग्रेसला सत्ता मिळवता आली तरी टिकवता येत नाही, हे मध्य प्रदेश, कर्नाटक, अरुणाचल प्रदेश आदी राज्यांमधील उदाहरणांवरून वारंवार स्पष्ट झाले आहे. विकले जाणारे असले तर विकत घेणाऱ्यांचे काम सोपे होते. लोकशाहीमध्ये आमदारांचा बाजार मांडला जातो. त्यात विकत घेणारे आणि विकले जाणारे दोघेही दोषी असतात. एकट्या विकत घेणाऱ्याला दोष देऊन चालत नाही. अर्थात त्यामुळे विकत घेणारा दोषी नसतो, असे नाही. कर्नाटकमध्ये काँग्रेसचे सरकार प्रचंड बहुमताने स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री एस. सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यातील भांडणाच्या बातम्या चर्चेत आहेत. याचे पर्यावसान सरकार पडण्यामध्ये होणार नसले तरी दखलपात्र राजकीय अस्वस्थता निर्माण होत आहे, हे महत्वाचे.

पक्ष सत्तेत आणण्यासाठी एकाने कष्ट करायचे आणि मुख्यमंत्रिपदाची माळ पडते दुसऱ्याच्या गळ्यात हे राजस्थान, मध्य प्रदेश आणि कर्नाटकम ध्येच घडले असे नाही. काँग्रेसची ती परंपरा आहे. दरबारी राजकारण करणाऱ्यांना सत्तेची पदे मिळतात आणि मासबेस नेत्यांची कुचंबणा होते, हे राजेश पायलट, माधवराव शिंदे, ममता बॅनर्जी, शरद पवार आदींनी अनुभवले आहे. नव्या पिढीत हे दुःख सचिन पाटलट, डीके शिवकुमार, ज्योतिरादित्य शिंदे, हेमंत बिसवा सरमा यांच्या वाट्याला आले. कर्नाटकमध्ये मुख्यमंत्रिपदावर डी. के. शिवकुमार यांचा अधिकार असताना सिद्धरामय्या यांना पुन्हा संधी देण्यात आली. दोघांमध्ये एकमत घडवून डी. के. शिवकुमार यांना उपमुख्यमंत्री केले असले, तरी त्या दोघांमधील शीतयुद्धाची चर्चा अजूनही होत आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात नेतृत्वबदल होऊ शकतो, असेही बोलले जात आहे.

या सर्व अटकळींच्या दरम्यान, कर्नाटकमधील एका दिग्गज काँग्रेस नेत्याने आपल्याच सरकारची खिल्ली उडवली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बी. के. हरिप्रसाद अलिकडेच म्हणाले की त्यांना मुख्यमंत्री कसे करायचे आणि पाडायचे हे माहीत आहे. मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने नाराज झालेल्या हरिप्रसाद यांनी आपल्या एका मागणीकडे दुर्लक्ष केल्याने मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर नाराजी व्यक्त केली. हरिप्रसाद म्हणाले, की मी सिद्धरामय्या यांना फक्त एकच गोष्ट मागितली होती. करकला येथे चेन्नई थीम पार्क बनवण्यासाठी पाच कोटी रुपयांचे अर्थसाह्य करावे असे म्हटले होते. त्यांनी मला पैसे देण्याचे आश्वासनही दिले होते; पण काहीही केले नाही. मी भूपेश बघेल यांना मुख्यमंत्री केले. याचा अर्थ मला मुख्यमंत्री कसे करायचे हे माहीत आहे आणि त्यांना पाडायचे कसे हेदेखील माहीत आहे.

काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने राज्याच्या मुख्यमंत्र्यांवर केलेल्या या घणाघाती टीकेमुळे सत्ताधारी पक्षात खळबळ उडाली. यावर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही; पण जी. परमेश्वर आणि डी. सुधाकर यांच्यासारख्या ज्येष्ठ मंत्र्यांनी हे हरिप्रसाद यांचे वैयक्तिक मत असल्याचे सांगून एकूण प्रकरण खोडून काढण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी दुसरीकडे डी. के. शिवकुमार यांनी कर्नाटकमध्ये प्रचंड बहुमत असूनही काँग्रेसचे सरकार पाडण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा दावा करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली. ते म्हणाले, 'मला माहित आहे की काही लोक आमचे सरकार पाडण्याचा कट रचत आहेत. या वेळी त्यांनी सरकार पाडण्याचे केंद्र बंगळुरुऐवजी सिंगापूर येथे गेल्याचा आरोप केला. शिवकुमार म्हणाले, मला मिळालेल्या माहितीनुसार, भाजप आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते करार करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना बंगळुरु आणि दिल्लीमध्ये बैठका घ्यायच्या होत्या; पण ते करू शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी सिंगापूरचे तिकीट बुक केले. शिवकुमार यांनी एकदा नव्हे, तर दोनदा सरकार पाडण्याचा मुद्दा उपस्थित केला होता. दुसरीकडे, भारतीय जनता पक्षाने हे सर्व आरोप फेटाळून लावले आणि म्हटले की काँग्रेस आमदार बी. के. हरिप्रसाद यांच्या नाराजीपासून मीडिया आणि जनतेचे लक्ष वळवण्यासाठी हे सर्व दावे केले जात आहेत. राज्याचे माजी गृहमंत्री अरगा ज्ञानेंद्र म्हणाले, की काँग्रेस सरकार पाडण्यासाठी बाहेरच्या व्यक्तीची गरज नाही. काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या भांडणाकडे लक्ष वेधताना भाजप आमदाराने ही टीका केली. हरिप्रसाद यांच्या वक्तव्यानंतर सिद्धरामय्या यांचे समर्थक आणि काँग्रेसच्या कर्नाटक युनिटचे सचिव वरुण महेश यांनी एक व्हिडीओ जारी केला. त्यात त्यांनी हरिप्रसाद यांना सिद्धरामय्या यांच्या विरोधात बोलल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावण्याची मागणी केली. सरकार स्थापनेच्या दोन महिन्यांमध्येच काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत मतभेद सुरू झाले आहेत का, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी मात्र सत्ताधारी काँग्रेसमध्ये कोणत्याही प्रकारचा असंतोष नाही, असे स्पष्ट केले. शिवकुमार यांचे सरकार अस्थिर करण्याबाबतचे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा ३० हून अधिक आमदारांनी त्यांच्या मतदारसंघातील विकासकामे न झाल्याबद्दल चिंता व्यक्त करणारी पत्रे लिहिली आहेत.

आमदारांना पत्र लिहिल्याच्या दाव्यावर सिद्धरामय्या आणि शिवकुमार म्हणाले की, पक्षाच्या आमदारांमध्ये कामाबद्दल कोणतीही चिंता असल्याची तक्रार नाही. काही विकासकामांवर चर्चा करायची होती, विधानसभेचे अधिवेशन होते. आमच्या पाच हमी योजना लोकांपर्यंत पोहोचत आहेत की नाही, भ्रष्टाचार होत आहे की नाही याबाबत आम्ही आमदारांशी चर्चा करून मार्गदर्शन घेणार होतो; परंतु विधानसभेच्या अधिवेशनात वेळेच्या कमतरतेमुळे या सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी विधिमंडळ पक्षाची बैठक होऊ शकली नाही, असे स्पष्टीकरण शिवकुमार यांनी दिले. शिवकुमार यांनी सरकार अस्थिर करण्याबाबत केलेले भाष्य हवेतील नक्कीच नाही.

महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस फुटल्यानंतर माजी मुख्यमंत्री आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते एच. डी. कुमारस्वामी यांनी महिनाभरात महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटकमध्येही मोठी उलथापालथ होईल, असा दावा केला. माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते बी. एस. येडियुरप्पा यांनीही कर्नाटकमध्ये काहीही होऊ शकते, असे म्हटले. दोन्ही नेत्यांच्या या वक्तव्यामुळे घबराट निर्माण झाली होती.

२२४ विधानसभा सदस्य असलेल्या कर्नाटकमध्ये बहुमताचा आकडा ११३ आहे. सध्या राज्यात भारतीय जनता पक्षाचे ६६ आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे १९ आमदार आहेत. हे दोघे मिळून केवळ ८५ चा आकडा गाठतील. हा आकडा बहुमताच्या ११३ पेक्षा खूपच कमी आहे. अशा परिस्थितीत भाजप आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाची युती झाली तरी काँग्रेसचे सरकार पडू शकत नाही. त्यामुळे बहुमत नसतानाही सरकार पडण्याची चर्चा हे नेते कशाला करतात, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभावीक आहे. कुमारस्वामी आणि येडियुरप्पा मानतात की राष्ट्रवादीप्रमाणेच काँग्रेसमध्येही फूट पडली आणि असे काही झाले तर कर्नाटकमध्येही राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता आहे. कर्नाटकमध्ये सध्या काँग्रेसचे १३५ आमदार आहेत. याशिवाय एका अपक्ष आमदाराने पक्षाला पाठिंबा दिला आहे. सरकार पाडण्यासाठी ११३ आमदारांचा पाठिंबा आवश्यक असल्यामुळे काँग्रेसचे तीस आमदार फुटून सत्तास्थापनेसाठी बाहेर पडल्याशिवाय उपयोग नाही. काँग्रेसकडे आजघडीला बहुमताच्या आकड्यापेक्षा २३ जागा जास्त आहेत. अर्थात पक्षाकडे तक्रार करणाऱ्या काँग्रेस आमदारांची संख्या तीसच्या घरात आहे, हे ही विसरता येत नाही. कदाचित त्यामुळेच कर्नाटकमध्ये एखादे वादळ येऊ घातले आहे का, हे तपासून पहावे लागेल.

आजकाल

आगळ्या चळवळीचा निर्माता - नाना पाटील

तुषार गायकवाड

ब्रिटीश राजवटीचा जुलुम त्यांच्याच पध्दतीने मोडून काढण्यासाठी मवाळ क्रांतिकारकांच्या चळवळींपेक्षा एका वेगळ्या चळवळीची निर्मीती स्वातंत्र्यवीर क्रांतिसिंह नाना पाटील यांना केली. ब्रिटीशांच्या ईस्ट इंडिया कंपनी सरकारला समांतर अशा 'प्रतिसरकार' ची उभारणी सातारा जिल्ह्याच्या उत्तरेला नीरा पात्रापासून कोल्हापूरच्या वारणा खोऱ्यांपर्यंत सुरु केली.

तत्कालीन सातारा जिल्ह्यातील आमच्या रेठरे बु।। गावच्या शेजारीच असलेल्या बहे-बोरगांव या गावात क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जन्म झाला. नानांचे मूळ गांव येडेमच्छींद्र. ब्रिटीशकालीन इयत्ता सातवीचे (व्हर्नाक्युलर फायनल) शिक्षण पूर्ण झाल्यावर नानांनी काही काळ तलाठ्याची नोकरी केली. अल्पावधीतच नानांनी नोकरी सोडून ब्रिटीशांची गुलामी मोडून काढली.

केवळ 'प्रतिसरकार' घोषित केल्याने प्रतिसरकार निर्माण व कार्यरत होत नाही. सरकार चालवण्यासाठी हत्यारबंद सैनिकांची गरज असते. ती पूर्ण करण्यासाठी नानांनी 'तुफान सेना' निर्माण केली. या सेनेत कुंडलच्या जी.डी.बापू लाड यांच्याकडे महत्वाची जबाबदारी होती. तुफान सेनेत तलवार, भाले, जांबिया पासून हातबॉम्ब ते बंदुकीपर्यंतच्या हत्यारांचे प्रशिक्षण दिले जात होते.

सरकार चालवण्यासाठी आवश्यक असलेला पैसा ब्रिटीशांचा खजिना लुटून उभा केला जात असे. क्रांतिसिंहाचे सरकार भूमिपूत्रांवर अन्यायकारक कर लादून चालत नव्हते हे क्रांतिसिंहांच्या प्रतिसरकारचे वैशिष्ट्य होते!

ज्याप्रमाणे घोड्याच्या पायाच्या खुरांमध्ये नाल ठोकतात, त्याचप्रकारे बैलांच्या पायाच्या खुरांमध्ये पत्री ठोकतात. प्रतिसरकार चालवत असताना माजलेल्या गावगुंडांना पाय बांधून बैलाला पत्र्या ठोकल्याप्रमाणे चोप मार दिला जात होता. शेतकऱ्यांना त्रास देणारे सावकार, आयाबहीणींचा उपमर्द करणारे गावटगे, ब्रिटीशांचे हेर यांचा नि:पात या शिक्षेव्दारे केला जात असे. या 'पत्री मारणे' शिक्षेमुळे तसेच प्रतिसरकार शब्दाचा अपभ्रंश होवून पुढे प्रतिसरकारचा उल्लेख 'पत्रीसरकार' असा होवू लागला.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी नाना कित्येकदा तुरुंगात गेले, ब्रिटीशांनी नानांना पकडण्यासाठी जंग जंग पछाडले पण हाती लागतील ते क्रांतिसिंह कसले? नाना भूमिगत असताना त्यांच्या घरावर जप्ती आणली, त्यांची जमीन सरकारजमा केली. भारताला स्वातंत्र्य मिळणार हे नक्की झाल्यावरच १९४६ मध्ये क्रांतिसिंह भूमिगत न राहता कराडात प्रकटले. या प्रतिसरकारची जासुसी विनायक दामोदर सावरकर यांच्या हिंदूमहासभेचे कार्यकर्ते करत असत. त्याबदल्यात हिंदूमहासभेचे कार्यकर्ते ब्रिटीशांकडून पैसे घ्यायचे. वाळव्यात हिंदू महासभेच्या कार्यकर्त्यांनी नागनाथ अण्णा नायकवडी यांना पकडून देण्यासाठी ब्रिटीशांना माहीती दिली. वाळव्याच्या पोस्टाच्या पेटीतील पत्रे गोळा करताना पोस्टमन रामभाऊ शिंदे याना 'डी. एस. पी. सातारा' यांचे नावे लिहिलेले एक पत्र सापडले. त्यात लिहिलं होतं, 'आपण सोपवलेली जबाबदारी मी पार पाडली आहे. मी आपल्याला केव्हा व कुठे भेटावे ते सांगा' आणि खाली सही होती 'एस. डब्ल्यू. देशपांडे.' हे एस. डब्ल्यू. देशपांडे म्हणजे वाळव्यातील हिंदू महासभेचे कार्यकर्ते 'श्री सदाशिव वामन देशपांडे.'

तुफान सेनेच्या सैनिकांनी सदाशिव देशपांडेच्या घरी जाऊन त्याला उचलून गावाबाहेर नेले आणि त्याचा उजवा हात आणि डावा पाय तोडला. याच प्रतिसरकार मध्ये माझे पणजोबा गोविंदराव गायकवाड (आबा) सक्रिय होते. त्यांच्या आबा या टोपण नावावरुनच घरच्यांनी कुटूंबातून त्यांचा वैचारीक लढा लढणाऱ्या एक अकेल्या अस्मादिकांचे नामकरण 'आबा' असे केले आहे. होय मी निर्विवादपणे गांधीवादी आहे. पण गांधीवादी असलो तरी वैचारीक डिएनए प्रतिसरकारचा आहे.

स्वातंत्र्यवीर क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!!

लोकसंसद

दोन राष्ट्रगीतांचे जनक : टागोर

आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबदद्ल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने ''सर'' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे

व्हायरल

टिळकांचं योगदान नाकारणे हा करंटेपणा

आधुनिक भारताचे म्हणजे नवीन सामाजिक-राजकीय रचना निर्माण होत असतानाचे पहिले नेते, लोकमान्य टिळक होते.

नेटिवांच्या अर्थात भारतीयांच्या राजकीय हक्कांची मागणी त्यांनी प्रखरपणे केली. हे राजकीय हक्क कोणाचे असा प्रश्न होता. मात्र प्रत्येक समूह राजकीय हक्काबाबत जागृत झाला त्यासाठी ब्रिटिशांकडे मागणी करू लागला, संघर्ष करू लागला, वा वाटाघाटी करू लागला. ही प्रक्रिया आजपर्यंत सुरु आहे. टिळकांचे विरोधकही हीच मागणी करतात. ही टिळकांची थोरवी. टिळक ब्राह्मण होते आणि त्यांच्या काळात राजकीय हक्कांची चळवळ प्रामुख्याने ब्राह्मण वा उच्चवर्णीयांसाठी होती त्यामुळे टिळकांना सर्वप्रथम ब्राह्मणांचं नेतृत्व करावं लागलं. मात्र त्यानंतर टिळक समस्त हिंदूंचे नेते बनले. स्वतंत्र हिंदुस्तान (त्यावेळी भारत हा शब्द प्रचलित नव्हता) हवा असेल तर मुस्लिमांच्या राजकीय हक्कांनाही सामावून घ्यावं लागेल हे लोकमान्य टिळकांनी अचूक ओळखलं. त्यामुळे टिळक समस्त भारतीयांचे नेते झाले. त्यांच्या अंत्ययात्रेत मुसलमानही सहभागी झाले होते. एक मुस्लीम तरुण त्यांच्या चितेमध्ये उडी घेणार होता.

ब्राह्मण, हिंदू, भारतीय असे लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाचे टप्पे आहेत. गांधीजींचं नेतृत्व दक्षिण आफ्रिकेत उदयाला आलं. इंडियन ओपिनियन हे त्यांचं वर्तमानपत्र इंग्रजी, तमिळ, गुजराथी आणि हिंदी भाषेत प्रकाशित होत असे. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेतच गांधीजी समस्त भारतीयांचे नेते झाले. वेदोक्त-पुराणोक्त प्रकरणात टिळकांची भूमिका योग्य नव्हती. टिळक असोत की गांधीजी त्यांच्या सर्व भूमिकांशी कोणीही सहमत होणार नाही. परंतु गांधीजी टिळकांच्या नाही तर दादाभाई नवरोजींच्याही खांद्यावर उभे होते. पहिल्या युद्धात काँग्रेसने म्हणजे हिंदुस्तानने ब्रिटनला बिनशर्त मदत करावी असं गांधीजींचं म्हणणं होतं. मात्र टिळकांची भूमिका वेगळी होती. भारतीयांना त्यावेळच्या भाषेत नेटिवांना अधिक राजकीय अधिकार वा हक्क मिळणार असतील तर आम्ही ब्रिटिशांना सहकार्य करू, अशी टिळकांची भूमिका होती. गांधीजी व टिळक यांचे या प्रश्नावर मतभेद होते. तुमची भूमिका मला पटणारी नाही परंतु तुमच्या विरोधात मी बोलणार नाही, असं सांगून गांधीजींनी सदर सभेमध्ये भाषण करण्याचं नाकारलं. टिळक आणि गांधी यांच्यामध्ये मतभेद होते, मतभिन्नता होती मात्र दोघांनाही परस्परांबद्दल कमालीचा आदर होता. लखनौ येथील काँग्रेसच्या अधिवेशनात चंपारण्यातून आलेले गृहस्थ प्रथम टिळकांना भेटले. टिळकांनी त्यांना सांगितलं की तुम्ही गांधीजींना भेटा. त्यानुसार ते गांधीजींना भेटले आणि त्यानंतर इतिहासाने वेगळी कलाटणी घेतली. अवंतिकाबाई गोखले चंपारण्यात गेल्या होत्या. त्यांनी गांधीजींचं पहिलं चरित्र मराठी भाषेत लिहीलं त्याला टिळकांची प्रस्तावना आहे.

लोकमान्य टिळक वगळता केसरी-मराठाची टीम हिंदुत्ववादी होती. त्याचं श्रेय वा अपश्रेय टिळकांकडे जातंच. परंतु कोणत्याही माणसाला त्याच्या काळाच्या मर्यादा असतातच. मग ते टिळक असोत की आणखी कोणी. लोकमान्य टिळकांना मनूवादी ठरवणं हा गाढवपणा आहे. कारण नव्या राजकीय व्यवस्थेची लोकमान्य टिळकांना जाण होती, ते कायदेपंडित होते.

नोकरशाही हा शब्द लो. टिळकांचा आहे. त्यांनी मराठी भाषेत अनेक नव्या शब्दांची भर घातली. आपण आज जी भाषा वापरतो ती चिपळूणकर, लोकमान्य टिळकांची आहे मात्र आपण जे विचार मांडतो ते म. जोतिराव फुलेंचे आहेत. याला म्हणतात डायलेक्टिक्स वा द्वंद्वात्मक विकास. समाज अशा प्रकारे विकसित होतो. एकविसाव्या शतकात ब्रिटिशपूर्व आणि ब्रिटिशकालीन राजकारण सुरु ठेवणं आपल्या हिताचं नाही. आयडिया ऑफ इंडिया म्हणजे भारत हा देश सर्व जाती-धर्म-वंश-भाषा यांचा आहे, स्वतंत्र हिंदुस्तानात प्रत्येक व्यक्तीला समान हक्क असतील, घडवण्यात लो. टिळकांचं योगदान नाकारणं हा करंटेपणा आहेच परंतु ती बाब अनैतिहासिकही आहे.

- सुनील तांबे

प्रेरणा

निंदा आणि स्तुती

अभंग क्र.२३
निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ।।१।।
मज हें ही नाहीं तें ही नाहीं । वेगळा दोहीं पासुनी ।।ध्रु.।।
देहभोग भोगें घडे । जें जें जोडे तें बरें ।।२।।
अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुकयांचें ।।३।।

अर्थ : या जगात आपली कुणी स्तुति करो वा निंदा करो, मला त्याचे काही सुखदुःख वाटत नाही. कारण निंदा व स्तुति या दोन्ही गोष्टीं पासून मी निराळा आहे. पूर्वसंचितानुसार या देहाला सुखदुःख प्राप्त होतात, ते देहभोग मी निमुटपने भोगतो.तुकाराम महाराज म्हणतात मी विठ्ठलरूप असल्यामुळे माझे देह भोग मी विट्ठलालाच अर्पण करीत आहे.

निवडक

मासळी भाव घसरले

अलिबाग : दोन महिन्यांचा बंदी काळ संपल्यानंतर १ ऑगस्टपासून कोळी बांधवांनी मासेमारीला सुरुवात केली आहे. त्यामुळे बंदी काळात महाग झालेली मच्छी आता काही प्रमाणात स्वस्त झाली आहे. त्यात अधिक श्रावण महिना सुरू असल्याने आवक वाढली असली तरी खवय्यांकडून खरेदी केली जात नाही. त्यामुळे मच्छीचे दर कमी झाल्याचे दिसून येत आहे. आधी पाचशे रुपयांना मिळणारी मच्छी आता शंभर-दोनशेला मिळत आहे.

तरण तलावाला कुलूप

नवी मुंबई : नवी मुंबई क्षेत्रात महापालिकेच्या माध्यमातून विविध क्रीडा प्रकारांना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. तसेच खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठीच्या सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याच उद्देशातून पालिकेने दोन वर्षांपूर्वी घणसोलीत जलतरण तलाव बांधला आहे. परंतु, तांत्रिक कारणास्तव तरण तलावाला टाळे असल्याने सुविधा असूनही जलतरणपटूंच्या पदरी निराशा आली आहे. तलाव लवकरच सुरू होईल, अशी माहिती पालिका आयुक्तांनी दिली आहे.

भरदिवसा घरफोडी

नवी मुंबई : नेरूळ गाव सेक्टर-२० मधील सद्गुरू अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या प्रतिभा म्हात्रे यांच्या घरात भरदिवसा घरफोडी करून तब्बल पाच लाख ६५ हजारांचा ऐवज चोरण्यात आला आहे. याप्रकरणी नेरूळ पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल आहे. बुधवारी (ता. २) सकाळी १०.३० प्रतिभा म्हात्रे घराला टाळे लावून सासूच्या घरी कामासाठी गेल्या होत्या. याच दरम्यान त्यांच्या घराचा कडी-कोयंडा तोडून रोख रकमेसह दागिने तसेच इतर ऐवज चोरण्यात आला.

नायजेरियन नागरिक अटकेत

पनवेल : पनवेल परिसरात एमडी (मेथाक्युलॉन) या अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या ॲग्यू पास्कल उर्फ केलेची ओन्लेमा (२४) या नायजेरियन नागरिकासह शाबाज फिरोज एलुकरला (२९) पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत २ लाख ७० हजारांच्या अमली पदार्थांसह एक स्कुटी जप्त करण्यात आली आहे. पनवेल भागात साईनगरकडे जाणाऱ्या रोडवरील ओपन जिमजवळ आरोपी अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

खचलेल्या रस्त्याकडे दुर्लक्ष

अलिबाग : तालुक्यातील सहान बायपासपासून बेलकडेपर्यंतच्या रस्त्याची साईडपट्टी अनेक ठिकाणी खचली आहे. काही ठिकाणी परिसरातील नागरिकांनी मातीच्या पोत्या भरुन बाजूला लावल्या आहेत. परंतु, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप याठिकाणी काहीच उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे याठिकाणी मोठा अपघात झाल्यास याला जबाबदार कोण, असा प्रश्न नागरिकांसह वाहनचालकांकडून विचारण्यात येत आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

७ ऑगस्ट

१) श्रीम. निला नारायण सावंत
अलिबाग, ७-८-१९३८

पंचांग

७ ऑगस्ट २०२३
सोमवार
विक्रम संवत्- २०७९
श्रावणशके संवत्- १९४५
संवत्सर - शोभननाम
अयन- दक्षिणायन
मास- श्रावण
ऋतु- वर्षा
कृष्ण पक्ष
तिथि : सप्तमी २८:१४:३८+
नक्षत्र : अश्विनी २५:१६:१९+
योग : शूल १८:१६:११
करण : विष्टि १६:४२:०४
करण : बव २८:१४:३८+
सूर्य : कर्क
चन्द्र : मेष०१:४३:४६
हिजरी सन् - १४४५
मुस्लिम मास - मोहरम
तारीख - १९
विशेष

सुडोकू

	7		8		2			
		3	1			8		2
2				4			9	5
				7		2		8
8		5		1		3		4
1		7		3				
7	5			8				9
4		6			1	5		
			9		5		4	

PRESS SERVICES OF INDIA

रविवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

2	1	8	9	6	3	5	7	4
7	3	9	4	5	1	2	6	8
4	6	5	8	2	7	9	1	3
9	8	6	5	7	4	1	3	2
1	5	2	6	3	8	4	9	7
3	4	7	2	1	9	6	8	5
5	9	4	7	8	6	3	2	1
8	2	3	1	9	5	7	4	6
6	7	1	3	4	2	8	5	9

अंगणवाडी सेविकांची आरोग्य तपासणी

दहा प्रकाराच्या आजारांची होणार तपासणी; बालकल्याण विभागाची मोहीम

। रायगड । प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील आरोग्य सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका अशा जनतेबरोबर थेट संपर्क असणाऱ्या महिलांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. राज्य सरकाराच्या महिला बालकल्याण आयुक्तालय यांनी याबाबतच्या मार्गदर्शक सूचना जिल्हा परिषद महिला बालकल्याण विभागाला दिल्या असून, त्यानुसार जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या सहकार्याने ही आरोग्य तपासणी मोहीम राबण्यात येणार आहे. यात महिलांमध्ये सामान्यपणे आढळणाऱ्या दहा आजारांची तपासणी करून त्यानुसार सेविकांना शासकीय आरोग्य संस्थेमार्फत आरोग्य सल्ला देण्यात येणार आहे.

ग्रामीण भागात बालकांसह, गरोदर माता यांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या तसेच महिला बालकल्याण विभागाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवणाऱ्या, वेळप्रसंगी आरोग्य विभागाच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या तसेच शासनाच्या विविध योजना यांची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा निर्णय महिला बालकल्याण आयुक्तालयाने घेतला आहे. यासाठी महिलांमध्ये सामान्यपणे पद्धतीने आढळून येणारे दहा आजारांची तपासणी करण्यात येऊन त्यावर उपचार आणि वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या महिमेमुळे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे आरोग्यविषयक प्रबोधन होण्यासोबत आरोग्यविषय जागृती होणार आहे. यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाची मदत घेण्यात असून पुढील महिन्यांपासून या आरोग्य तपासणी मोहीम आखणी करण्याचे काम सुरू आहे. यामुळे आरोग्य सेविकांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्यात आनंदाचे वातावरण आहे.

या तपासण्यांचा समावेश

या आरोग्य तपासणीत अंगणवाडी सेविका, मदतनीस याचे हिमोग्लोबीन, रक्तदाब, लघवी, हृदय रोगाच्या तपासणीसाठी आवश्यक असणारी ईसीजी, गर्भाशय पिशवी कॅन्सर, स्तन अन्य प्रकारच्या कॅन्सरच्या स्वतंत्र तपासण्या, दातांची आरोग्य तपासणी, मुख कन्सर तपासणी आदी तपासण्यांचा समावेश आहे. या तपासणीत आजारांनुसार संबंधितांवर शासकीय आरोग्य संस्था यांच्यामार्फत उपचार आणि मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

आरोग्य कुंडलीच तयार

पहिल्या टप्प्यात आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रात अंगणवाडी सेविकांना पाठवण्यात येणार असून, त्या ठिकाणी उलपब्ध असणाऱ्या तपासण्या करण्यात येणार आहेत. त्यानंतर ग्रामीण रुग्णालय, गरज असल्यास उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालात पुढील तपासण्या होणार आहेत. या आरोग्य तपासणीमुळे ग्रामीण भागात राबणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची आरोग्य कुंडलीच तयार होणार आहे.

उषःकाल फाऊंडेशनची अनोखी वाटचाल

। माणगाव । प्रतिनिधी ।

उषःकाल फाऊंडेशन दिवंगत परिचारिका उषा नामदेव शिंदे आणि आदिप दामा शिंदे यांच्या स्मरणार्थ स्थापन करण्यात आला आहे. ६ ऑगस्ट २०२१ रोजी मुंबई-गोवा महामार्गावर एका अपघातात उषा शिंदे यांचा नाहक बळी गेला. त्यानंतर त्यांचे पती नामदेव दामा शिंदे, मुलगा रोहन मुलगी स्नेहल आणि शिंदे कुटुंबिय व इतर सहकारी यांनी उषःकाल फाऊंडेशनची निर्मिती केली.

यामध्ये नामदेव शिंदे यांच्या पत्नी स्व. उषा शिंदे तसेच त्यांचे दिवंगत बंधू आदिप दामा शिंदे जे कोकण कृषी विद्यापीठाचे सुवर्णपदक विजेते होते त्यांच्या स्मृती जागविण्यासाठी नामदेव शिंदे यांनी उषःकाल फाउंडेशनतर्फे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा निर्धार केला आहे. फाउंडेशनतर्फे दरवर्षी राबविण्यात येत असलेल्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक उपक्रमांचे रायगड जिल्ह्यातून विशेष कौतुक होत आहे.

उषःकाल फाऊंडेशन दरवर्षी आरोग्य, शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करते. वारक येथील आदिवासी वाडी येथील मुलांना दप्तर आणि शैक्षणिक साहित्याचे नुकतेच फाऊंडेशनकडून वाटप झाले. संस्थेचे संस्थापक नामदेव शिंदे यांनी आपले उर्वरित आयुष्य उषःकाल फाऊंडेशनसाठी देण्याचा निर्धार केला आहे.

एकाच दिवशी १८ घरांना वीजजोडणी

महावितरणची ग्राहकाभिमुख सेवा

। भाकरवड । वार्ताहर ।

महावितरण आपल्या ग्राहकांना दर्जेदार व अखंडित सेवा देण्यासाठी नेहमी तत्पर असते. पेण मंडळातील अलिबाग उपविभाग २ मधील पोयनाड येथे एकाच वेळी १८ ग्राहकांना तात्काळ नवीन वीजजोडणी देऊन महावितरणने सामाजिक बांधिलकी जपली आहे. ग्राहकाभिमुख सेवा देत असतानाच तात्काळ नवीन जोडणी देण्याचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या तत्पर कार्यशैलीचा भाग म्हणून महावितरणमध्ये ग्राहकाभिमुख तात्काळ सेवा राबविण्यात येत आहेत. नवीन वीज कनेक्शन घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना शहरी भागात चोवीस तासात तर ग्रामीण भागात ४८ तासात कनेक्शन देण्याची मोहीम राज्यभर सुरु असून, मुख्य अभियंता भांडूप परिमंडल सुनील काकडे यांनी तिन्ही मंडळातील अधीक्षक अभियंत्यांना सदर मोहिमेची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. याचाच एक भाग म्हणून पेण मंडळातील अलिबाग उपविभाग २ मधील पोयनाड येथे वीज ग्राहकांना तात्काळ नवीन जोडणी देण्याचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

नवीन वीज कनेक्शन घेऊ इच्छिणाऱ्या महावितरणच्या ग्राहकांना नवीन वीज जोडणी देणे, ग्राहकांच्या तक्रारी सोडवणे यामध्ये प्रचंड प्रमाणात वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर, अधीक्षक अभियंता पेण मंडळ श्री इब्राहीम मुलाणी व कार्यकारी अभियंता अलिबाग शैलेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग २ येथील उपकार्यकारी अभियंता कमलाकर अंबाडे यांनी पोयनाड शाखा १ व २ येथे कॅम्प आयोजित केले. सदर कॅम्पमध्ये सकाळी ९:३० पासून दुपारी २ वाजेपर्यंत १८ ग्राहकांना तात्काळ वीज जोडणी देऊन महावितरणने 'शासन आपल्या दारी' याचा उत्तम प्रत्यय दिला आहे.

या कार्यक्रमासाठी पोयनाड शाखा १ व २ येथील कनिष्ठ अभियंता रुपेश नागावकर, संदीप म्हात्रे, ओमप्रकाश सावळे व आकाश झाकिरे यांनी मेहनत घेतली आहे. यापुढेही ग्राहकांना तत्पर सेवा देऊन महावितरण आपला एक वेगळा ठसा निर्माण करेल, अशी आशा ग्राहक प्रतिनिधी देवव्रत पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. पोयनाड व कुसुंबळे येथील वीज ग्राहक व ग्राहक प्रतिनिधी म्हणून राजेश टेमकर, देवव्रत पाटील यांची उपस्थिती होती.

'आवंदा होऱ्या लवकर उतरल्या दर्यान'

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

सर्वसाधारणपणे नारळी पौर्णिमेला सागराला नारळ अर्पण करुन मासेमारी बोटी समुद्रात उतरुन मासेमारीचा हंगाम सुरू होतो. परंतु, यंदा मराठी पंचांगानुसार श्रावण महिना अधिक आल्याने मासेमारीचा हंगाम लवकर सुरु होत आहे. मुरुड तालुक्यातील किनारी भागातील कोळीवाड्यांमध्ये सध्या मच्छिमारी बोटी समुद्रात उतरवण्याची लगबग वेगाने सुरू आहे.

बोटी समुद्रात उतरवण्यापूर्वी बोटीच्या तळाला लाकूड कुजू नये याकरिता लावण्यात येणारे पारंपरिक करंजाचे तेल आणि रंगरंगोटी करण्याचे काम गेल्या पंधरा दिवसांपासून बंदरात सुरू आहे. मासळी पकडण्याच्या जाळ्यांची दुरुस्ती, नवीन जाळ्यांची खरेदी याबरोबर बोटीच्या दोरांची मजबुती तपासणी आणि आवश्यक तो दुरुस्ती ही सारे कामे आता अखेरच्या टप्प्यात आली आहेत. विविध रंगांनी बोटी रंगून बंदरे आता रंगीबेरंगी झाली आहेत, तर बोटी माडांच्या ओंडक्यावरुन ट्रॅक्टरच्या साह्याने खेचून समुद्रात उतरवण्याच्या कामांना वेग आला आहे.

(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

लक्ष्मण पेमारेंसारख्या कार्यकर्त्यांमुळे मी घडलो

बाळाराम पाटील यांनी व्यक्त केली भावना

। नेरळ । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या पहिल्या फळीमुळे मी कार्यकर्ता म्हणून घडलो, त्यात कर्जतहून पनवेलमध्ये येणारे लक्ष्मण पेमारे यांच्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांनी आम्हाला घडविले आहे. त्यांच्या जाण्याने शेतकरी कामगार पक्षाचे मोठी हानी झाली असून, ती भरून येणारी नाही. लक्ष्मण पेमारे यांच्या रूपाने नव्या पिढीसाठी असलेले मार्गदर्शक हरपले गेल्याची भावना शिक्षक मतदारसंघाचे माजी आमदार अध्यक्ष बाळाराम पाटील यांनी व्यक्त केली.

रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष लक्ष्मण पेमारे यांचे २ ऑगस्ट रोजी निधन झाले होते. त्यानंतर पेमारे कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी माजी आमदार बाळाराम पाटील नेरळ येथे आले होते. पेमारे यांच्या घरी आल्यानंतर बाळाराम पाटील यांनी लक्ष्मण पेमारे यांच्या आठवणींना उजाळा दिला. पनवेल मतदारसंघात आमदार राहिलेले दत्तूशेठ पाटील यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षामधील पेण, कर्जत, खालापूर आणि उरण तालुक्यातील तसेच नवी मुंबईमधील कार्यकर्त्यांच्या राबता असायचा. त्यावेळी मी लहान असल्याने त्या सर्व ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सहवास मला लाभला. त्या सर्व ज्येष्ठांच्या मार्गदर्शनामुळे शेतकरी कामगार पक्षाची पताका आजही फडकत असून, ती सर्व जुनी घराणी आजही शेतकरी कामगार पक्षाचे विचार पुढे नेत आहे. जुनी मंडळी आमच्या तात्यांकडे आल्यावर त्यांची विचारपूस करण्यापासून पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांशी संबंध आला आणि त्यातून आम्ही समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचलो. ज्येष्ठांची ती शिकवण मला आणि माझ्यासोबत काम करीत असलेल्या सर्व कार्यकर्ता यांच्यासाठी शिदोरी आहे, असे प्रतिक्रिया बाळाराम पाटील यांनी व्यक्त केली.

लक्ष्मण पेमारे यांच्यासारखे कार्यकर्ते हीच शेतकरी कामगार पक्षाचे खरी ताकद होती.त्यांच्या जाण्याने शेतकरी कामगार पक्षाचे संपूर्ण जिल्ह्यात मोठे नुकसान आणि हानी झाली आहे, असा शोक बाळाराम पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी शेकापचे तालुका चिटणीस श्रीराम राणे, पुरोगामी युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष देवा पाटील, जि.प. माजी सभापती नारायण डामसे, कृ.उ.बा. माजी सभापती गजानन पेमारे, पं.स. माजी उपसभापती यशवंत जाधव, राजन हरपुडे आदी उपस्थित होते.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क-
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

१. प्रेमजी जिवराज जैन, स्मरणार्थ, अमृत स्टोअर्स, मारुती नाका, अलिबाग
२. कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग

शब्दकोडे क्र.२०१



आडवे शब्द : १. सुंदर पती-पत्नीचा जोडा, ५. हार, ८. काळे ज्वालाग्रही खनिज, ११. मऊ, मृदू, ११अ. दारुचा एक प्रकार, १२. यजमान, पती, १४. रक्षण करणारा, १५. बाजार, १६. पावसाची झड, १७. पापणी न हलवता (पाहणे), १९. सरपणाचे दुकान, २१. संत रामदासस्वामी यांनी रचलेला ग्रंथ, २४. जोम, मस्ती, २५. अवस्था, दशा, २७. पंख, २८. तुरुंग, २९. काठाच्या नक्षीप्रकारामुळे प्रसिद्ध धोतरप्रकार ---- काठी, ३१. वर्ष, ३२. अडकित्याने कातरण्याचे विड्यात घातले जाणारे फळ, ३४. हळद पिऊन का अशी होता येणार?, ३५. कागदावर आखलेला कप्पा, ३७. आचारी, ३९. माफी मागणारा, ४२. दिवाणखाना, ४३. सत्य, ४४. अतिरेक, टोक, ४५. मोठे गाव, ४७. मातापिता, ५१. कुटी, ५२. कागदाचे एक परिमाण, ५३. ढीग, चळत, ५४. शाळेतील शिक्षिका, ५५. केस काळे करण्याचे साधन, ५७. वेल, ५९. समुद्र, ६१. विनोबाजींच्या गीतेवरील ओव्या, ६३. लढतना मृत्यू येणे, ६५. अखंड, ६६. दृष्ट, ६७. स्त्री, ६८. रोखलेली नजर, ६९. शेळी, ७१. मैत्रीण, ७२. ठराविक पैसे, ७४. पायंडा, पद्धत, ७६. दरोडा, ७८. धोकादायक, ८०. माणूस, ८२. सूर्याचे एक नाव, ८४. सटकन, पटकन, ८५. मातीचा कण, ८६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च.

उभे शब्द : १. रत्नजडित माळ, २. अंत:करण, ३. किंमत, ४. नमन, ५. मागील अंगणाचा दरवाजा, ६. मीठ, ७. अरण्य, ८. नवाकोरा, ९. रेचक, १०. एक पालेभाजी, १३. दरारा, इभ्रत, वजन, १८. सुसर, २०. जनगणना, २२. नरमांजर, २३. पृथ्वी, २५. भूतकाळ, २६. चिंतन, २७. परीक्षा घेणारा, ३०. आशीर्वाद देणारी, ३१. मित्र, ३३. प्रयत्न, ३६. बेकरीतील एक गोड पदार्थ, ३८. पहाटेची गाढ निद्रा, ४०. तुळशीमाळ धारण करणारा, ४१. पार्थिवावरचे वस्त्र, ४५. यमपुरी, ४६. घरातील मोठी माणसे, ४८. घाबरणे, ४९. एक बारीक धान्य, ५०. पायाचे उभे हाड, ५४. स्त्रीलंपट, ५६. चकचकीत, स्वच्छ, ५८. चांदणी, ५९. भेग, चीर, ६०. किल्लेदार, ६२. दिवसाचा चोविसावा भाग, ६४. धनुष्यबाण, ६५. अफूचे बी, ६७. पूर्ण नेस्तनाबूत, ६९. भाजपची विद्यार्थी संघटना, ७०. ज्ञाती, ७३. विचारांचे, भावनांचे इंद्रिय, ७५. होडी, ७७. वसन, वस्त्र, ७९. बशीचा जोडीदार, ८१. नवरामुलगा, ८३. तीक्ष्ण नजरेचा पक्षी,

शब्दकोडे क्र.२०० चे उत्तर

आडवे उत्तर : १.वळीव ३.मस ४.पराभव ७.राम ९.सावकार १०.वरपक्ष १२.पर १३.कापडचोपड १६.तपन १८.रासगरबा १९.खोपट २०.वाद २१.बाराखडी २३.खेटर २४.भरभर २६.पोप २७.तप २९.साक्ष ३०.संगीत ३२.दादला ३५.रम्य ३६.नशा ३८.चक्रवाक ४०.मालदार ४१.नवसागर ४२.चरक ४४.मनन ४५.मन ४६.चमक ४८.मधोमध ५०.रोज ५२.भरीत ५३.कळप ५४.नरम ५६.महाभारत ५८.मर्द ५९.टीका ६२.रती ६३.गजानन ६५.पाताळयंत्री ६८.चाकवत ६९.देव ७०.काळजी ७२.कव ७३.पो ७४.गबाळ ७६.वरदान ७९.रडारड ८०.सुवास ८१.मीन ८२.नरवीर

उभे उत्तर : १.वटका २.वऱ्हाड ३.मसाप ३अ.सवड ४.परतपरत ५.भवन ६.वर ७.राक्षस ८.बरबाद ९.साप ११.परान्नभक्षण १२.परवानगी १४.पसारा १५.चोपडी १७.पट १९.खोट २१.बारदान २२.खटला २३.खेप २५.रसा २६.पोक २८.परकर ३०.संकलन ३१.तगर ३३.दशानन ३४.चक्र ३७.ससाणा ३८.चरचरीत ३९.धोपटी ५०.रोम ५१.लोहा ५२.भरती ५३.कर्दनकाळ ५५.रसाळ ५६.मनकवडा ५७.भारत ५८.मजा ६०.कांपा ६१.संत्री ६३.गवगवा ६४.नळ ६६.तावदान ६७.यंदा ६८.चाकर ७१.जीवन ७५.बास ७७.नर ७८.तार

नि व ड क

कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

नेरळ : कर्जत तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच तसेच अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. कर्जत मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला पार पडला. याप्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख संभाजी जगताप, तालुका संघटक सुनील रसाळ, तालुका सहसंपर्कप्रमुख हर्षद विचारे, उपतालुका प्रमुख मिलिंद विरले, संतोष कोळंबे आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकांसमोर मोठं आव्हान

नवी मुंबई : खारघर परिसरात पन्नासहून अधिक खासगी शाळा आहेत, तर दहाहून अधिक महाविद्यालये, नामांकित इन्स्टिट्यूट असून एक लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, याच खारघर शहरामध्ये गांजा, चरस, ई-सिगारेट अशा अमली पदार्थांची सर्रास विक्री केली जात असून नशाविक्रीच्या बाजारात तरुणाई केंद्रस्थानी ठरत आहे. तरुणाई या जीवघेण्या नशेच्या आहारी जात असल्याने पालक, पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे.

भूमिपुत्रांचा ठाम निर्धार

नवी मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यावरून सर्वपक्षीय कृती समिती आक्रमक झाली आहे. याच अनुषंगाने गुरुवारी उरण येथील आगरी समाज मंडळ येथे बैठक पार पडली. दरम्यान, नामकरण आंदोलनाचा पुढील भाग म्हणून क्रांतिदिनी विमानतळाच्या क्षेत्रात लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरणाचा फलक लावून हजारो भूमिपुत्रांच्या उपस्थितीत अनावरण होणार आहे.

कामे अंतिम टप्प्यात

अलिबाग : तालुक्यातील भातलावणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. महिनाभरापासून सुरू असलेली भात लावणी पुढील दोन-चार दिवसात पूर्ण होईल, अशी माहिती शेतकऱ्यांकडून देण्यात येत आहे. महिनाभर उशिरा सुरू झालेल्या पावसामुळे शेतीची कामेसुद्धा लांबणीवर पडली होती. परंतु, त्यानंतर पावसाने जोर पकडल्याने शेतांमध्ये पाणी साचले. त्यामुळे भातलावणीच्या कामांनीसुद्धा वेग घेतला होता. त्यामुळे आता शिवार हिरवेगार दिसून येत आहे.

माकडांचा उपद्रव सुरूच

अलिबाग : तालुक्यात अनेक ठिकाणी माडकांचा उपद्रव सुरू असून, शेतकऱ्यांच्या बागायतींची नासधूस करीत आहेत. टोळी-टोळीने फिरणारी ही माकडे घरांचेदेखील मोठे नुकसान करीत आहेत. झाडांवरुन घरांवर उड्या मारताना सिमेंटचे पत्रे, कौले फुटत असल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. वनविभागाने ही बाब गांभीर्याने घेऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

महाडमध्ये भूगर्भातून स्फोटांचे आवाज

कसबे शिवथर, कुंभे शिवथर ग्रामस्थ भयभीत; प्रशासन सतर्क; भूगर्भ तपासणी होणार

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील कसबे शिवथर आणि कुंभे शिवथर या दोन गावांमध्ये भूगर्भातून आवाज येत असल्याने ग्रामस्थ धास्तावले आहेत. रविवारी महाडचे प्रांताधिकारी डॉ. ज्ञानोबा बाणापुरे आणि तहसीलदार महेश शितोळे यांनी या गावांना भेट देऊन पाहणी केली. या भागाची भूगर्भ तपासणी करण्यासाठी भूगर्भ तज्ज्ञाना पाचारण करण्यात येणार आहे.

शनिवारी, दुपारी चार वाजल्यापासून या दोन्ही गावांत जमिनींमधून स्फोटसदृश्य आवाज येऊ लागले. रात्री आठ वाजण्याच्या सुमारास मोठा आवाज झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाला या प्रकाराची माहिती मिळताच एनडीआरएफ आणि रायगड पोलीस दलाची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा या गावांमध्ये रवाना करण्यात आली.

आज महाडचे प्रांताधिकारी डॉ. ज्ञानोबा बाणापुरे आणि तहसीलदार महेश शितोळे यांनी या गावाला भेट देऊन पाहणी केली. ग्रामस्थांसमवेत एक बैठक घेऊन त्यांनी या प्रकाराची माहिती घेतली. या गावांत तातडीने भूगर्भ तज्ज्ञ पाठविण्यात येणार असल्याचे डॉ. बाणापुरे यांनी सांगितले. यावेळेस सरपंच रमेश सकपाळ, पोलीस पाटील श्रेया गुरव यांच्यासह मंडल निरीक्षक, स्थानिक तलाठी उपस्थित होते. ग्रामस्थांनी सतर्कता बाळगावी, कोणीही घाबरुन जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाकडून ग्रामस्थांना करण्यात आले आहे.

पारमाची, तळीयेत झाली होती दुर्घटना

याच गावापासून काही अंतरावर असलेल्या पारमाची या गावावर सन १९९४ साली, तर तळीये या गावावर सन २०२१ मध्ये दरड कोसळून मोठ्या प्रमाणावर प्राणहानी झाली होती.

> एनडीआरएफच्या टीमने गावाच्या आजूबाजूचा परिसराची पाहणी केली. मात्र, जमिनीला कुठेच भेगा पडल्याचे दिसून आलेले नाही. या परिसराची पाहणी करण्यासाठी भूगर्भतज्ज्ञांना बोलाविण्यात आले आहे. त्यांचे पथक सोमवारी येथे येऊन पाहणी करणार आहे. त्यांच्या अहवालानंतरच आवाजामागचे कारण समजू शकेल.
> - डॉ. ज्ञानोबा बाणापुरे, प्रांताधिकारी

आगरकोटच्या तटबंदीवरील झाडांचा वाहनांना धोका

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

गावाचे वैभव असलेला आगरकोट किल्ला हा येथील ग्रामस्थांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. या किल्ल्यातून गावातील मुख्य रस्त्यावर अहोरात्र वाहनांची जा-ये सुरू असते. कुंडलिका समुद्र खाडी पुलावरून येताना समोरील बोगद्याच्या तटबंदीवर मोठ मोठी झाडे वाढली आहेत. त्या झाडांच्या फांद्या मुख्यः रस्त्याच्या बाजूने पसरलेल्या आहेत. त्या फांद्यांमुळे वाहनांना अडथळा निर्माण होत आहे. या ठिकाणी अपघात होण्याआधी संबंधित विभागाने फांद्यांची छाटणी करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

या आगरकोट किल्ला तटबंदी मार्गाने अलिबागकडे जा-ये करणारी वाहने तसेच विविध व्यवहार करण्यासाठी रेवदंडा बाजारपेठेत भेट देणारे, विविध शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची नित्याने ये-जा सुरू असते. निसर्ग चक्रीवादळात तटबंदीवरील वृक्षाचा काही भाग तुटून महावितरण कंपनीच्या विद्युत वाहिन्यांवर पडला होता. भविष्यात कोणतीही दुर्दैवी घटना घडून नये यासाठी संबंधितांनी त्वरित लक्ष्य देऊन फांद्यांची छाटणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

रायगडकरांना टोलमाफी मिळावी

मनसेची मागणी; मंत्री रवींद्र चव्हाणांना निवेदन

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

महामार्गाच्या दुरवस्थेमुळे प्रवासी, रुग्ण, गर्भवती महिला व वाहनचालकांचे प्रचंड हाल होतात. अशातच या मार्गाला पर्यायी मार्ग असलेल्या मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेचा वापर आता रायगड व कोकणवासीय करीत आहेत. मात्र, खालापूर टोलनाक्याला टोलचा नाहक भुर्दंड बसतो, त्यामुळे रायगड जिल्ह्यातील वाहनांना खालापूर टोलनाक्यावर टोलमाफी मिळावी, अशी मागणी मनसे दक्षिण जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड यांनी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांना निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले की, महामार्गाच्या दुरवस्थेने प्रवाशी व वाहनचालक प्रचंड त्रस्त झाले आहेत. यामध्ये साऱ्यांचा वेळ, शारीरिक त्रास आणि वाहनांचे फार मोठे नुकसान होते. हे नुकसान टाळावे यासाठी रायगड जिल्ह्यातील लोक मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेचा पर्याय म्हणून वापर करतात. मात्र, याठिकणी खालापूर टोल नाक्यावर फास्ट ट्रॅक रक्कम असूनही स्कॅन होत नसल्यामुळे विनाकारण टोल जास्त आकारला जातो, त्याचाही भुर्दंड होतो. याठिकाणी लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. सदर टोल नाक्यावर प्रवाशांची अक्षरशः लूट केली जाते. रायगडमधून मुंबईला ये-जा करणाऱ्या वाहनांना टोलमाफी मिळावी, अशी मागणी मनसेने केली आहे. यावेळी देवेंद्र गायकवाड, मनसे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष, सुभाष जाधव, संजय गायकवाड, साईनाथ धुळे, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाघ्रण येथे केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

। वाघ्रण । वार्ताहर ।

सेवाश्रम सामाजिक विकास सेवा संस्था वाघ्रणच्या वतीने केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धा मंगळवार, दि. १ ऑगस्ट रोजी पार पडल्या. लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेच्या पूजनाने स्पर्धेचे उद्घाटन झाले. या स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून नेहरु युवा केंद्राचे रायगड जिल्हा कोऑर्डीनेटर निशांत रौतीले, वाघ्रण शाळा मुख्याध्यापिका संगिता म्हात्रे, भारतभूषण ॲड. जिवीता पाटील, वाघ्रण ग्रा. पं. प्रशासक सुवर्णा पाटील, विविध शाळांचे शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रारंभी सेवाश्रम संस्थेचे अध्यक्ष वाघ्रण ग्रा.पं. सदस्य पत्रकार दीपक यशवंत पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. निलेश वारगे यांनी स्पर्धकांना कोड क्रमांक देऊन शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सर्व मुलांना परीक्षक पद्माकर पाटील व जीविता पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेमध्ये एकूण ३५ मुलांनी सहभाग घेतला होता. लोणघर, पेढांबे, वाघ्रण, चिंचवली, मांडवखार, नारंगी, बहिरिचा पाडा आणि मानकुळे या शाळांतील हे सर्व स्पर्धक होते. 'माझी शाळा, माझा गाव, माझी आई, आला पावसाळा, माझा छंद, मोबाईल हवा की नको, मी झाड बोलतो' इत्यादी विषयांवर मराठी आणि इंग्रजी भाषेत मुलांनी भाषणे केली.

या स्पर्धेत इयत्ता दुसरी-तिसरीमध्ये कीर्ती प्रणय ठाकूर लोणघर प्रथम, अंश अजित पाटील द्वितीय पेढांबे, इयत्ता चौथी-पाचवीमध्ये प्रथम कार्तिक सुनिल पाटील मांडवरवार, द्वितीय शुभ्रा अजय पाटील पेढांबे तर इयत्ता सहावी-सातवीमध्ये फातीमा समशेद सय्यद प्रथम पेढांबे, निहार अमोल पाटील द्वितीय नारंगी आणि पर्णवी प्रयाग पाटील तृतीय क्रमांक पटकाविला. इग्रंजी माध्यमात प्रेम मंगेश पाटील वाघ्रण, प्रणव राकेश म्हात्रे बहिरिचा पाडा, अबीदा अशरफ सय्यद पेढांबी दुसऱ्या गटात, निदा महम्मद सय्यद पेढांबे तसेच फिजा कसीमुद्दीन शेख-नारंगी, ओमकार अजित हुमणे पेढांबे यांनी बाजी मारली. स्वरा रोशन पाटील प्रथम, तर आराध्या मनोज पाटीलने द्वितीय क्रमांक पटकाविला.

या सर्व विजेत्यांना सेवाश्रम संस्थेकडून शैक्षणिक साहित्य, शिक्षिका सुलभा ठोमरे यांच्याकडून पारितोषिके आणि नेहरू युवा केंद्राकडून प्रशस्तीपत्रके वाटप करण्यात आली.

यावेळी दिपक पाटील यांनी या स्पर्धेसाठी कै. सितेज हेमंत पाटील यांच्या स्मरणार्थ विवेक केसरीनाथ पाटील-खारपेढांबे यांनी दिलेल्या बक्षिसांबद्दल आणि संस्था संचालक किशोर पाटील पेझारी व रविकीरण पाटील वाघ्रण यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद दिले, तसेच सर्व उपस्थित पालक आणि संस्था संचालकांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उदय पाटील, महेंद्र म्हात्रे, नेहा पाटील, राजेंद्र पाटील, उदय शेरमकर, ॲड. प्रणाली पाटील यांनी सहकार्य केले.

मणिपूर येथील घटनेचा वंचितकडून निषेध

। वेणगाव । वार्ताहर ।

मणिपूर राज्यात काही दिवसापासून तेथील आदिवासी समाजावर अन्याय व अत्याचार होत आहे , तेथील महिलांची नग्न अवस्थेत धिंड काढून बलात्कार करण्यात आला. या निंदनीय घटनेचे सर्वत्र निषेध होत आहे. दरम्यान, या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत देशाच्या राष्ट्रपतींनी लक्ष घालावे, असे निवेदन कर्जत तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने कर्जतचे तहसीलदार शीतल रसाळ यांना देण्यात आले.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव अनिल गवळे, जिल्हा संघटक सुनील गायकवाड, तालुकाध्यक्ष धर्मेंद्र मोरे, तालुका महासचिव प्रदीप ढोले, सहसचिव प्रमोद वारे, तालुका उपाध्यक्ष राजेश गायकवाड, कर्जत शहराध्यक्ष लोकेश यादव, नेरळ शहराध्यक्ष मुकेश गायकवाड, तालुका संघटक प्रदीप गायकवाड, कमलाकर जाधव, प्रज्वल गायकवाड, सचिन जाधव आदी वंचितचे कार्यकर्ते उपस्थित होते.

नारळफेकी स्पर्धा सुरु करण्याच्या हालचाली

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

नारळी पौर्णिमा (रक्षाबंधन) उत्सव काही दिवसांवर येऊन ठेपलेला आहे. श्रीवर्धन शहरात गेल्या अनेक वर्षांपासून नारळी पौर्णिमा हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदा देखील सालाबादप्रमाणे उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. पंधरा वर्षांपूर्वी कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव जातीय तणावामुळे बंद करण्यात आलेली नारळ फेकण्याची स्पर्धा पूर्ववत सुरु करण्याचा काही मंडळी विचार करत आहेत. त्यासंदर्भात बैठका घेतल्या जात आहेत. मात्र, ज्या कारणास्तव बंद झालेली स्पर्धा पुन्हा सुरु झाल्यास पुन्हा जाती-जातीत वाद होण्याची व कायदा सुव्यवस्था बिघडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

श्रीवर्धनमधील ज्येष्ठ समाजसेवक कै. विनायक मापुस्कर यांच्या घरी सजवलेल्या पाच नारळांचे पूजन श्रीवर्धनचे तहसीलदार यांच्या हस्ते केले जाते. यावेळी पोलीस अधिकारी व शहरातील अन्य प्रतिष्ठित नागरिकांना आमंत्रित केले जाते. नारळाचं पूजन झाल्यानंतर आरती केली जाते. त्यानंतर नारळांना वंदन करून पारंपरिक पध्दतीने खालुबाजा सनईसहित मिरवणूक समुद्रकिनारी जाते. समुद्रकिनारी तहसीलदार व अन्य मान्यवर यांच्या हस्ते श्रीफळांचे विधीवत पूजन केल जाते. त्यानंतर हे पाच नारळ सागराला अर्पण करण्यासाठी पूर्वापार सरकार, शेट्ये, कुळकर्णी, वर्तक व अधिकारी असे पाच मानकरी असतात.

या मानकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून शहरातील तरुण मुलं नारळ फेकण्याच्या स्पर्धेत सहभागी होत असत. कोणाचा नारळ (श्रीफळ) सर्वप्रथम सागराला अर्पण होतो, याकरिता वाद्याच्या गजरात एक धावण्याची स्पर्धा आयोजित केली जात असे. मात्र, या स्पर्धेला कालांतराने जातीय रंग चढू लागला. श्रीफळ मानकऱ्यांचे पण माळी समाजाच्या मुलाने पहिला नारळ टाकला तर माळी समाजाचा नारळ पहिला पडला. भंडारी समाजाचा नारळ पहिला पडला, तर कधी कोळी समाजाचा नारळ पडला अशी चढाओढ निर्माण होऊ लागली. ज्याचा नारळ पहिला पडेल त्या समाजाचा धंदा रोजगार चांगला चालेल, अशी अंधश्रद्धादेखील पसरवली जात असे.

ज्या मंडळींना पुन्हा ही स्पर्धा सुरु करायची आहे, ते आयोजनात केव्हाही नसतात. नारळ फेकण्याची स्पर्धा पुन्हा सुरु केल्यास श्रीवर्धन शहरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी लागणार आहे. यावर रायगडचे पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

मुलीच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्या वाटप

। माणगाव । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद शाळा शिंदेकोंड येथे सिया श्रीकांत सुदर्शन हिच्या पाचव्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना वह्या, पेन व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. श्रीकांत सुदर्शन यांनी विनाकारण वाढदिवसावर खर्च करण्यापेक्षा त्याच खर्चातून सामाजिक बांधिलकी म्हणून शालेय मुलांना वह्या, पेन इतर साहित्य व खाऊ वाटप करण्याचा निर्णय आम्ही कुटुंबियांनी घेतलेला आहे. मुलांच्या वाढदिवसाला अनाठायी खर्च करण्यापेक्षा त्या खर्चातून सामाजिक बांधिलकी जोपासत मुलांना शालेय साहित्य वाटप करावे, असे आवाहन केले आहे.

सुदर्शने कुटुंबियांनी सामाजिक वारसा जोपासत वेगळा आदर्श निर्माण केला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी डॉ. श्रीकांत सुदर्शने, जयेश गायकवाड, सुमित तांबे, आदित्य कांबळे, राकेश मोहिते, शाळेच्या मुख्याध्यापिका किरण जाधव, बालाजी गुबनरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बालाजी गुबनरे यांनी मानले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ विद्यानगर, वरसोली येथे बंगला भाड्याने/विकणे आहे. ९८२२९९२३०४/८५३०५८७३१६

■ Office staff vacancy for office in Alibag Graduate candidates can call for interview 9923750549

■ अलिबाग मध्ये ब्युटी पार्लर रिसेप्शन कामासाठी मुलगी पाहिजे मोबा. ८१४९८६५६२५

■ अलिबागमध्ये सलून (ब्युटी पार्लर) अनुभवी कामासाठी मुले मुली पाहिजे. मोबा. ९९२१० ७३९६३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

अर्चना सुळ यांचे विद्यार्थ्यांसह शेतकऱ्यांना मार्गदर्शन

तृणधान्यापासून पौष्टिक खाद्यपदार्थांची निर्मिती करा

। चिरनेर । वार्ताहर ।

तृणधान्यापासून पौष्टिक खाद्यपदार्थांची निर्मिती करून, दैनंदिन आहारात तृणधान्याचा समावेश करा, असे आवाहन उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी शालेय विद्यार्थ्यांना व शेतकऱ्यांना केले. पीकविम्याचे फायदेसुद्धा त्यांनी यावेळी शेतकऱ्यांना पटवून सांगितले.

चिरनेर येथील प्राथमिक केंद्र शाळेत प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना तृणधान्याचे आहारातील महत्त्व व गुणधर्म पटवून देण्यासाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम ठेवण्यात आला होता. यावेळी त्या आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होत्या.

यावेळी श्री महागणपती सेंद्रिय शेती गटामार्फत शेतकऱ्यांसाठी चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात प्रधानमंत्री पीक विमा, जलयुक्त शिवार अभियान, शेतकरी उत्पादक कंपनी आणि प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना तसेच अन्य कृषी विभागाच्या योजनांविषयी सविस्तर माहिती मंडळ कृषी अधिकारी किसन शिगवण यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिली.

यावेळी तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ यांनी पीकविम्याविषयी बोलताना, राज्यातील शेतकऱ्यांचा पिक विमा भरण्याची जबाबदारी राज्य सरकारने घेतली आहे. सरकार एक रुपयामध्ये शेतकऱ्यांचा आपल्या शेतातील उभ्या पिकाचा विमा उतरविणार येणार आहे. नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. तर शासनाच्या कृषी विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या खरीप हंगाम २०२३ या स्पर्धेत, उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाला कृषी मंडळ अधिकारी किसन शिगवण ,कृषी पर्यवेक्षक शिवाजी लोहकरे ,कृषी सहाय्यक अधिकारी सूरज घरत, पोलीस पाटील संजय पाटील, माजी सरपंच संतोष चिरलेकर, कृषी मित्र प्रफुल्ल खारपाटील तसेच चिरनेर गावातील शेतकरी, शिक्षक व विद्यार्थी या दोन्ही कार्यक्रमाला उपस्थित होते.

> बदललेल्या परिस्थितीमुळे मुलांमध्ये स्थूलता निर्माण झाली आहे. ही स्थूलता कमी करण्यासाठी आपल्या मुलांना तृणधान्यापासून तयार केलेला पौष्टिक आहार दैनंदिन आहारात दिला पाहिजे. २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य पौष्टिक तृणधान्य वर्ष साजरे करण्यात येत आहे.
> – अर्चना सुळ, तालुका कृषी अधिकारी

महामार्गावर मोकाट गुरांचा सुळसुळाट

वाहनचालक त्रस्त; आधीच खड्ड्यांची डोकेदुखी, त्यात आणखी भर

। सुकेळी । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गावर तसेच वाकण-पाली मार्गावर मोकाट गुरांचा सुळसुळाट असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. आधीच महामार्गावरील खड्ड्यांमुळे त्रस्त झालेल्या वाहनचालकांना या मोकाट गुरांचा त्रासदेखी सहन करावा लागत आहे. गुरांच्या वाढत्या संख्येमुळे वाहनचालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

या गुरांना कोणी वाली आहे की नाही? ती रस्त्यावर मोकाट सोडून देण्यात आली आहेत की

काय? असा प्रश्न उभा राहिला आहे. या गुरांचे कळपच्या कळप रस्त्याच्या मधोमध उभे असतात. त्यांच्यामागे कोणीही गुराखी वैगरे दिसुन येत नाहीत. तसेच वाहनचालकांना जाण्यासाठी रस्ताच मोकळा नसल्यामुळे गाडीचा हॉर्न वाजवूनसुद्धा गुरे बाजूला होत नाहीत. शेवटी वाहनचालकांना गाडी उभी करुन गाडीतून खाली उतरून त्यांना बाजूला करावे लागते. ही मोकाट गुर महामार्गावरील वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात अडथळा ठरत असून, वाहतूक कोंडीदेखील होत आहे.

दरम्यान, अनेकदा या गुरांमध्ये झुंज होत असते. या झुंजींमुळे अनेक गाड्यांना अपघात होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या घटना बऱ्याच वेळा घडत आहेत. त्यामुळे या गुरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी वाहनचालकांसह परिसरातून होत आहे.

शालोपयोगी वस्तूंचे वाटप

गडब : पेण तालुक्यातील बांगरवाडी प्राथमिक शाळेत निवृत्त मुख्याध्यापक के.पी. पाटील यांच्या विद्यमाने विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तुंचे वाटप करण्यात आले. यावेळी निवृत्त मुख्याध्यापक के. पी. पाटील, संतोष मांढरे, परशुराम बैकर यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते. आदिवासी, ठाकूर समाजाच्या विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन शैक्षणिक प्रगती वाढवावी व विविध स्पर्धा, खेळात सहभागी होऊन आपल्या शाळेचे नाव उज्वल करावे, असे के.पी. पाटील यांनी यावेळी सांगितले.

जनता विद्यामंदिराला ५० बेंचेस भेट

श्रीसंत ज्ञानेश्वर माऊली सेवामंडळाचा पुढाकार

। उरण । वार्ताहर ।

श्रीसंत ज्ञानेश्वर माऊली सेवामंडळ अजिवली यांच्यावतीने विद्यालयाची गरज पाहून जनता विद्यामंदिर अजिवली व कन्या प्रशाला अजिवलीला चांगल्या प्रतीचे एकूण ५० बेंच (एक लाख रुपये किंमतीचे) भेट देण्यात आले.

या कार्यक्रमासाठी सेवामंडळाचे माजी अध्यक्ष परशुराम माळी, विद्यमान अध्यक्ष संजय पाटील, उपाध्यक्ष रमेश माळी, कार्याध्यक्ष प्रकाश म्हसकर, खजिनदार गोविंद पाटील, दिनेश पाटील, संतोष गोजे, सुभाष गायकर, सदस्य गणेश पाटील, मेघश्याम पाटील, शाळा समितीचे सदस्य विठ्ठल गाताडे, अनंत पाटील, दीपक ठाकूर, फब्रीकेटर जहिर भाई तसेच विद्यालयाचे प्रा. डी.बी. चवरे, सर्व शिक्षक-शिक्षेकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

रेवदंड्यात अवैध धंद्यांना ऊत

मटका खुलेआम, तर गुटखा विक्रीसुद्धा बिनधास्त

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांना ऊत आला असून, बेकायदेशीर मटका खुलेआम सुरू आहे. तसेच गुटखा विक्रीसुद्धा बिनधास्तपणे होत आहे. याविरोधात महिलावर्गातून संताप व्यक्त करण्यात येत असून, यावर तात्काळ कारवाईची मागणी होत आहे.

रेवदंडा व परिसरात बेकायदेशीर मटका सुरू असून, भ्रमणध्वनीच्या माध्यमातून भररस्त्यात मटका एजंट व्यवसाय साधून आड मार्गाला उभे राहून घेतलेल्या मटकाचे आकडे भ्रमणध्वनीद्वारेच मटका मालकांना पाठवित आहेत. एकदंरीत, भ्रमणध्वनीद्वारे मटका व्यवसायपूर्वीपेक्षा तेजीत सुरू आहे. मटका खेळून झटपट श्रीमंत होण्याच्या नादाने अनेक युवावर्ग वाममार्गाला लागले असल्याचे चित्र आहे. महिना व दिवसभरातील आर्थिक उत्पन्नाचा भाग मटका खेळून घालवीत असल्याने महिलावर्ग संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. सदर मटका व्यवसाय पूर्णतः बंद करावेत, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे. गुटखा विक्रीस पूर्णतः बंदी असतानासुद्धा रेवदंडा व परिसरात बेकायदेशीपणे गुटखा विक्री केली जात आहे. तरी, या बेकायदेशीर धंद्यांवर पोलिसांचा वचक केव्हा बसेल, असा प्रश्न महिलावर्गातून उपस्थित केला जात आहे.

नांदगाव विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

संतनामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा तीन गटात पार पडली. त्यामध्ये विद्यालयातील २६ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून लोकमान्य टिळकांचा जीवन परिचय मांडत असताना त्यांचे विचार, चतुःसूत्री कार्यक्रमाबद्दल माहिती सांगितली. या स्पर्धेचे परीक्षण स्वाती शिंदे, महेंद्र जाधव, भूषण सुतार यांनी केले. यावेळी प्रा. संभाजी ढोपे, शिक्षक बबन पालवे तसेच शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

स्टेट बँकेच्या कर्मचाऱ्यांची ग्राहकांशी अरेरावी

। कर्जत । प्रतिनिधी ।

स्टेट बँक ऑफ इंडिया कर्जत शाखेतील कर्मचारी नेहमीच उद्धटपणे वागतात, असा आरोप ग्राहकांनी केला आहे. कर्मचाऱ्यांच्या एकूणच वर्तणुकीबाबत संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, बँकेचे शाखाधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता, मी कर्मचाऱ्यांना समज देतो असे सांगून त्यांनी वेळ निभावून नेली.

बँकेचे काही नियम ठरले असतील तर त्यांनी ते बँकेच्या कार्यालयामध्ये प्रसिद्ध करावेत, मात्र बँकेतील कर्मचारी ठरवतील ती नियमावली बँकेत राबविली जाते, बँकेच्या प्रत्येक खिडकीत त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांची नियमावली असते, विशेष म्हणजे काही गोष्टी ते नम्रपणे न सांगता ग्राहकाला अपमानित करुन आणि ग्राहकांशी उद्धटपणे बोलून सांगतात, असा आरोप ग्राहकांनी केला आहे. खरे तर, ग्राहकांना सन्मानाची वागणूक दिली पाहिजे. तुम्ही स्लीप भरली आहे ती फाडून द्या, एटीएम कार्डमधून व्यवहार करा, ऑनलाईन व्यवहार करा, पासबुक बाहेरच्या मशीनमधून भरा, सर्वच गोष्टी ग्राहकांनी करायचे, तर बँकेतील कर्मचाऱ्यांनी काय करायचे, असा प्रश्न ग्राहकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

महाडमध्ये आदिवासींना दाखल्यांचे वाटप

। महाड । प्रतिनिधी ।

राज्य शासनाने १ ते ७ ऑगस्ट या कालावधीमध्ये महसूल सप्ताह सर्वत्र साजरा केला जात असून, शासन आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येत असताना ग्रामीण भागातील आदिवासी दुर्बल घटक यांचे विविध स्वरूपात दाखल्यांचे वाटप करण्यात येत आहे. या सप्ताहाचे औचित्य साधून तालुक्यातील पारवाडी आदिवासी वाडीमध्ये विविध प्रकारच्या दाखल्यांचे वाटप शुक्रवारी करण्यात आले.

दरम्यान, ४१ आदिवासींना जातीच्या दाखले, ३४ आदिवासींना ७/१२ च्या उताऱ्यांचे वाटप करण्यात आले, तसेच एका आदिवासी कुटुंबाला शिधापत्रक व उत्पन्नाचा दाखला देण्यात आला. या कार्यक्रमाला गोंडाळे मंडल अधिकारी लिना गुरव, सरपंच मंदा जगताप, मांडले येथील तलाठी प्रिया पंडित, गोंडाळे तलाठी कल्याणी खाडे, सामाजिक कार्यकर्त्या रेखा मेहकवाल, पायल वाडकर कल्पेश शेडगे ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

माणगाव येथे गुणवंतांचा गुणगौरव सोहळा

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुप आयोजित समाजातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवार, दि. ५ ऑगस्ट रोजी दुपारी कुणबी भवन माणगाव येथे तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्या हस्ते व साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. यावेळी समाजातील ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या दहावी व बारावीतील १०० विद्यार्थ्यांचा गुणगौरव उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

समाजातील दहावी व बारावीत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना शामराव पेजे स्मृती न्यासातर्फे वर्षाला दहा हजार रुपये शिष्यवृत्ती मिळते. याबाबत अधिक माहितीसाठी माणगाव कुणबी भवन येथे रवींद्र अर्बन यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या भावी आयुष्यात समाजासाठी काम करायला पुढे यावे, असे आवाहन केले. सोहळ्याच्या सुरुवातीस विघवली शाळेच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. त्यानंतर खालापूर तालुक्यातील इरशाळवाडी येथील दरडग्रस्त दुर्घटनेतील मृत बांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या सोहळ्यास तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे उपाध्यक्ष शैलेश भोनकर,सरचिटणीस शांताराम भोरावकर, खजिनदार रामभाऊ टेंबे, सदस्य बाळाराम नवगणे, साले ग्रुपचे उपाध्यक्ष सुभाष गुगळे, काशीराम पाखुर्डे, सरचिटणीस सखाराम खरंगटे, सहचिटणीस रवींद्र अर्बन, समाजनेते सहादेव बक्कम, संजय बक्कम, सुधाकर पालकर, सीताराम भोनकर, नामदेव खराडे, सखाराम जाधव, राजेंद्र जाधव, दिलीप जाधव, संजय शिंदे, कृष्णा पानावकर, काशीराम लहाने, नथुराम मोरे आदींसह साले पंचक्रोशीतील समाजबांधव, विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्याचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विघवली शाळेचे शिक्षक कृष्णा पानावकर यांनी केले.

उज्वला गोंजी सेवानिवृत्त

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस.ए. हायस्कूल व स्व. म.ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयच्या शिक्षिका उज्वला प्रकाश गोंजी २५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांचा सेवानिवृत्तीचा सोहळा शाळेतील गणेश हॉल येथे संपन्न झाला.

याप्रसंगी जंजिरा विद्या मंडळाचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर, उपाध्यक्षा प्रतिभा जोशी, सचिव चंद्रकांत अपराध, संचालक प्रमोद भायदे, मुखाध्यापक सरोज राणे, माजी मुख्याध्यापक उदय गद्रे, रमेश मोरे, माजी क्रीडा शिक्षक पांडुरंग आरेकर, मातोश्री योजना चुनेकर, पर्यवेक्षक सुनील गावडे, वरिष्ठ लिपीक राहुल वर्तक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह मार्निंग स्टाफ, त्यांच्या बहिणी, नातेवाईक व विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, उज्वला गोंजी यांना संस्थेतर्फे शाल, श्रीफळ, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच नातेवाईकाकडून टवस्तू देऊन गौरविण्यात आले.

यावेळी प्रतिभा जोशी, प्रमोद भायदे, उदय गद्रे, पांडुरंग आरेकर, मिलिंद खामकर, राहुल वर्तक, दिपाली जोशी, मीनाक्षी घुगे, अस्मिता गुरव यांनी उज्वला गोंजी यांनी शाळेत दिलेल्या योगदानाबद्दल मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली रोटकर यांनी केले, तर पर्यवेक्षक भास्कर मोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

मुरुडमध्ये जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

महसूल सप्ताहाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे व उपविभागीय अधिकारी अलिबाग सर्जेराव सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड दरबार हॉल येथे तहसीलदार रोहन शिंदे यांच्या उपस्थितीत जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मुरुड तहसीलदार रोहन शिंदे, विस्तार अधिकारी सुभाष वाणी, कृषी अधिकारी मनिषा भुजबळ, मुरुड-जंजिरा नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, मंडळ अधिकारी खुषाल राठोड, तलाठी रुपेश रेवसकर शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर, माजी तहसीलदार नयन कर्णिक, विजय पैर, दिनेश मिणमिणे, शुभांगी करडे, श्रीकांत सुर्वे, आशिष दिवेकर, श्री. खेडेकर, निलेश घाटवल, मनोज कमाने, उमेश माळी, फैरोज घलटे आदींसह प्रतिष्ठीत नागरिक व सर्व पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी जनसंवाद कार्यक्रमात विविध समस्यांवर उपस्थित नागरिक व सर्वपक्षीय नेत्यांनी चर्चा केली व आपल्या समस्या मांडल्या. यावर शासकीय अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

विघवली हायस्कूलमध्ये टिळकांची पुण्यतिथी

। माणगाव । प्रतिनिधी ।

तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या विघवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळ मंडळाचे विघवली विभाग हायस्कूल विघवली येथे १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने लोकमान्य टिळक जीवन कार्य या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांनी भूषविले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक वि.वि. पारकर शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

या स्पर्धेत लहान गटात प्रथम क्र. गार्गी नागेश शेपुंडे (इयत्ता ६ वी), द्वितीय अपूर्वा सचिन सापळे (इयत्ता ७ वी), तृतीय रुई गणेश जंगम (इयत्ता ६ वी) तर मोठ्या गटात प्रथम क्र. सुयोग गणेश वारेकर (इयत्ता ९ वी) व जय दाखिनकर (इयत्ता ९ वी), द्वितीय क्र. समिधा संजय बेंडखळे (इयत्ता ८ वी), तृतीय क्रमांक दर्शन दाजी मुंढे (इयत्ता ९ वी) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या स्पर्धेचे सूत्रसंचालन कृष्णा पानवकर यांनी करून लोकमान्य टिळकांविषयी माहिती दिली.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

लोकमान्य टिळकांना अभिवादन

। अलिबाग । वार्ताहर ।

प्रभाकर पाटील सांस्कृतिक कला मंचातर्फे प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय रामनारायण सभागृहात अध्यक्ष सखाराम पवार यांच्या हस्ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १०३ व्या पुण्यतिथीनिमित्ताने प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुळकर्णी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक शरद कोरडे, चारुशीला कोरडे, नगरसेवक बाळुशेठ पवार, कोमसाप अलिबाग शाखेचे सहकार्यवाह नंदु तळकर, माजी नगरसेवक आर.के. घरत, श्रीधर पाटील, जिल्हा रुग्णालय रक्तपेढीचे हेमकांत सोनार आदी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात उपस्थितांचे आभार हेमकांत सोनार यांनी मानले.

मुरुडमध्ये माजी सैनिकांचा सन्मान

। कोर्लई । वार्ताहर ।

शासनाच्या महसूल सप्ताह निमित्ताने जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या आदेशानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे व तहसीलदार रोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुडच्या दरबार हॉलमध्ये 'सैनिक हो तुमच्यासाठी' आयोजित कार्यक्रमात माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी तहसीलदार रोहन शिंदे, पोलीस निरीक्षक श्रीमती जाधव, नायब तहसीलदार राजश्री साळवी, अव्वल कारकून विजय मापुस्कर, रिमा कदम, मंडळ अधिकारी एस.टी. तवर, तलाठी, माजी सैनिकसैनिक, स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते माजी सैनिक अनिल विरकुड, सुनील ठाकूर, नितीन कारभारी, नितेश पाटील, अमित पाटील, प्रभाकर माळी, मुकेश नाक्ती, चंद्रकांत मयेकर, जनार्दन डयला, स्वातंत्र्यसैनिक सुनंदा भगत, आत्माराम मानकर यांच्या वतीने वीरपत्नी इंदुमती मानकर, अशोक शेडगे यांच्या वतीने चिरंजीव अमोल शेडगे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अनिल विरकुड, जनार्दन डयला व मुकेश नाक्ती यांनी सीमेवरील आपले अनुभव कथन केले. सूत्रसंचालन एस.टी. तवर यांनी केले.

पनवेलमध्ये 'जनसंवाद'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

। पनवेल । वार्ताहर ।

महसूल सप्ताहनिमित्त 'जनसंवाद' या कार्यक्रमाअंतर्गत पनवेल तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच पनवेल महानगरपालिका कर्मचारी यांच्यावतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पनवेल तहसीलदार विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यातील आजिवली येथील जनसंवाद कार्यक्रमांतर्गत नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांनी ग्रामस्थ तसेच विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करून ई-पीक पाहणी, ई-चावडी व पीकविमा याबाबतची माहिती देण्यात आली.

महाराष्ट्र शासन महसूल विभाग व वन विभाग यांच्या वतीने १ ते ७ ऑगस्टदरम्यान महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्याअंतर्गत शुक्रवारी (दि.४ ऑगस्ट) पनवेल तालुक्यातील नेरे व घेरावाडी येथील जनसंवाद कार्यक्रमांतर्गत मंडळ अधिकारी, तलाठी यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून ई-पिक पाहणी, ई-चावडी व पिक विमा याबाबतची माहिती देण्यात आली. कोळखे येथील ग्रामस्थांमसवेत पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांनी चर्चा करून स्मशानभूमीबाबतचा प्रश्न मार्गी लावला व ई-पिक पाहणी, ई-चावडी व पिक विमा योजना, संजय गांधी निराधार योजना, नवीन मतदार नोंदणी याबाबतची माहिती दिली.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

निवडक

रेसिंगपटूचा मृत्यू

चेन्नई : वेगाच्या छंदाने एका १३ वर्षीय मुलाचा जीव घेतला आहे. ही घटना मद्रास इंटरनॅशनल सर्किट येथे एमआरएफ एमएमएससी एफएमएससीआय इंडियन नॅशनल मोटरसायकल रेसिंग चॅम्पियनशिपमध्ये घडली. या स्पर्धेच्या तिसर्या फेरीदरम्यान झालेल्या अपघातामुळे बंगळुरू येथील १३ वर्षीय प्रतिभावान रेसर कोपाराम श्रेयस हरीशचा शनिवारी मृत्यू झाला. श्रेयसने नुकताच त्याचा वाढदिवस साजरा केला होता.

ऑसी कर्णधार जखमी

सिडनी : ॲशेस मालिकेतील अखेरच्या कसोटी सामन्यात मनगटाचे हाड मोडलेले असतानाही खेळणारा ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिंस पुढील महिन्यात होणाऱ्या भारत दौऱ्यास मुकण्याची शक्यता आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने कमिंसच्या दुखापतीची ही माहिती अधिकृतपणे उघड केलेली नाही. पुढील महिन्यातील भारत दौऱ्याची सुरुवात २२ सप्टेंबरपासून होत असून पहिला सामना मोहालीत होणार आहे.

भारत,विंडीजला दंड

नवी दिल्ली : भारत आणि वेस्ट इंडिज यांना आयसीसीकडून दंड ठोठावण्यात आला आहे. या दोन्ही संघांना संथगती षटके टाकल्याबद्दल दंड ठोठावण्यात आला आहे. या सामन्यात किमान षटकाच्या दरापेक्षा एक ओव्हर कमी असल्याने भारताला सामना फीच्या पाच टक्के दंड ठोठावण्यात आला. तर वेस्ट इंडिजला किमान ओव्हरच्या दरापेक्षा दोन ओव्हर कमी राहिल्याबद्दल त्यांच्या मॅच फीच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला.

आरसीबीचे नवे प्रशिक्षक

नवी दिल्ली : इंडियन प्रीमियर लीग २०२३ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू सहाव्या क्रमांकावर होता. संघाचे मुख्य प्रशिक्षक संजय बांगर आणि माइक हेसन यांचा संघासोबतचा करार संपला आहे. त्यामुळे आरसीबीकडून आता नव्या हेड कोचची नियुक्ती करण्यात आली आहे. आरसीबीनं नवे मुख्य प्रशिक्षक म्हणून अँडी फ्लॉवर यांची नियुक्ती केली आहे.त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या आयपीएलमध्ये संघ आशावादी बनला आहे.

जयदेव करोडपती

नवी दिल्ली: आयपीएलमुळे भारतातील अनेक क्रिकेटपटूंना 'अच्छे दिन' आले आहेत. यातीलच एक म्हणजे जयदेव उनाडकट.या क्रिकेटपटूने एक कोटींची कार खरेदी केली आहे. उनाडकट भारतीय क्रिकेट संघाचा एक भाग आहे. नुकतेच त्याला प्रदीर्घ कालावधीनंतर भारतीय संघात पुनरागमन करण्याची संधी मिळाली. जयदेव उनाडकटला खरी ओळख आयपीएलमधून मिळाली. तो सर्वात महागडा खेळाडू ठरला होता.

साताऱ्याची आदिती स्वामी तिरंदाजीत विश्वविजेती

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

गेल्याच महिन्यात ज्युनिअर गटात जग्गजेती ठरलेली साताऱ्याची तिरंदाज आदिती स्वामी हिने विश्वविक्रम करत शिरपेचात आणखी एक मोठा मानाचा तुरा खोवला. बर्लिन येथे सुरू असलेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत कंपाउंड प्रकारात ती विश्वविजेती ठरली.

याच गटात भारताच्या ज्योती सुरेखा वेन्नम हिने ब्राँझपदक मिळवून भारताची मक्तेदारी सिद्ध केली. १७ वर्षीय आदितीची ही आणखी एक ऐतिहासिक कामगिरी ठरली. वैयक्तिक गटात जग्गजेती ठरणारी ती भारताची पहिली महिला तिरंदाज ठरली.

कंपाउंड प्रकाराच्या अंतिम सामन्यात आदितीने दोन वेळच्या जागतिक पदक विजेत्या मेक्सिकोच्या अँड्रिया बेकेरा हिचा १४९-१४७ असा पराभव केला. ज्युनिअर आणि सिनिअर विश्वविजेतेपद मिळवणारी ती पहिली तिरंदाजही ठरली.

१६ वे मानांकन असलेल्या अँड्रिया हिने विद्यमान विश्वविजेत्या सारा लोपेझचा उपउपांत्यपूर्व फेरीत पराभव केला असल्यामुळे तिच्याकडून सुवर्णपदकाच्या अपेक्षा व्यक्त केल्या जात होत्या; परंतु आदितीचा सामना करणे तिला कठीण झाले. सहाव्या मानांकित आदितीने पहिले तीन बाण जवळपास अचूकतेच्या अगदी जवळ मारत ३०-२९ अशी आघाडी घेतली. त्यानंतर पहिल्या चार राउंडमधील १२ बाण अचूक लक्ष्यभेद करणारे ठरले.

सध्या कमालीच्या फॉर्मात असलेल्या आणि अचूक लक्ष्यभेद करत असलेल्या आदितीने हा सामना १४९-१४५ असा जिंकला. आदितीकडून झालेल्या या पराभवातूनही सकारात्मक ऊर्जा घेणाऱ्या ज्योतीने त्यानंतर ब्राँझपदकाच्या लढतीत तुर्कस्तानच्या इपेक तोम्रुर हिच्यावर १५०-१४६ अशी मात केली.

महाराष्ट्रीय कन्येचा जगात डंका

शिष्यांच्या कामगिरीने गुरु झाले धन्य

सातारा येथील रहिवासी असलेली अदिती शनिवारी वयाच्या १७ व्या वर्षी सर्वात तरुण ज्येष्ठ विश्व विजेती बनली, जेव्हा तिने बर्लिन येथे जागतिक तिरंदाजी स्पर्धेत कंपाऊंड महिला सुवर्णासह भारताचे पहिले वैयक्तिक विजेतेपद पटकावले. त्यानंतर ओजस देवतळे देखील १५० च्या अचूक स्कोअरसह कंपाऊंड पुरुषांचे विजेतेपद जिंकून जगज्जेते ठरला. या दोघांनी सातारा येथील पोलीस हवालदार प्रवीण सावंत यांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर ही कामगिरी केली आहे. तिच्या यशाने सावंत हे कमालाची भारावून गेले.केलेल्या कष्टाचे चीज झाले,अस त्यांनी पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत प्रवीण सांगितले. ते म्हणाले. अदिती जेव्हा माझ्याकडे आली होती, तेव्ही ती अप्रभावी होती. त्यावेळी आदिती १० वर्षांची सड-पातळ मुलगी होती. पण तिच्या जिद्दीने माझे लक्ष वेधून घेतले आणि हा प्रवास सुरू झाला. ती खरोखर मेहनती होती, स्पर्धेनंतरही ब्रेक घेत नसत आणि तासनतास इथे सराव करत असे. ती एक भावी चॅम्पियन आहे, हे मला माहीत होते,असे सावंत म्हणाले.

पाक संघाचे संतुलन बिघडले?

संघासमवेत मानसशास्त्रज्ञही येणार

। इस्लामाबाद । वृत्तसंस्था ।

यावर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीत जगभरातील संघ व्यस्त आहेत. क्रिकेटच्या महाकुंभात जगभरातून १० संघ सहभागी होणार आहेत. दुसरीकडे पाकिस्तानचा संघ भारतात येणार की नाही, हा चेंडू तेथील सरकारच्या हातात आहे. यावर काही दिवसांत निर्णय घेतला जाईल, मात्र पाक संघ सध्या तणावामध्ये आहे. त्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्ड हाय-प्रोफाइल स्पर्धेच्या दबावाचा सामना करण्यासाठी संघासह मानसशास्त्रज्ञ भारतात पाठवण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबतचा अंतिम निर्णय पीसीबीचे अध्यक्ष झका अश्रफ यांच्या कर्णधार बाबर आझम यांच्या भेटीनंतरच घेतला जाणार आहे. बाबर आझम सध्या लंका प्रीमियर लीग मध्ये कोलंबो स्ट्रायकर्सकडून खेळत आहे.

खेळाडूंसोबत मानसशास्त्रज्ञ असण्याने त्यांना मदत होईल, विशेषत: जेव्हा ते भारत दौऱ्यावर चांगली कामगिरी करत नसतील किंवा त्यांना बाहेरील दबाव जाणवत असेल,अशी अपेक्षा पीसीबीचे अध्यक्ष झका अश्रफ यांनी व्यक्त केली.तरपीसीबीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, पाकिस्तानसाठी मानसशास्त्रज्ञांची उपस्थिती अनिवार्य आहे, कारण ते २०१६ नंतर प्रथमच भारताला भेट देत आहेत. जका अश्रफ पीसीबीचे अध्यक्ष असताना त्यांनी खेळाडूंसोबत काम करण्यासाठी प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ मकबूल बाबरी यांना बोलावले होते आणि ते २०१२-१३ मध्ये त्यांच्यासोबत भारतात आले होते.

अधिकाऱ्याने पुढे सांगितले की, २०११ च्या विश्वचषकासाठी भारताच्या दौऱ्यापूर्वी पाकिस्तानी खेळाडूंनी क्रीडा मानसशास्त्रज्ञांसोबत काही सत्रे केली होती. पाकिस्तान वर्ल्ड कप २०२३ चे सामने हैदराबाद, कोलकाता, बेंगळुरू, चेन्नई आणि अहमदाबाद येथे खेळणार आहे.

प्रसारण हक्क विक्रीने बीसीसीआय होणार मालामाल

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आगामी पाच वर्षांच्या कालावधीसाठी मायदेशातील ८८ सामन्यांच्या प्रसारण हक्काच्या विक्रीचा उच्चांक गाठणार असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.या प्रसारण हक्कांमध्ये 'टीव्ही' आणि 'डिजिटल' असे दोन स्वतंत्र अधिकार दिले जाणार आहेत. या दोन्ही हक्कांची एकत्रित विक्री अंदाजे ८२०० कोटी रुपयाला होईल असे मानले जात आहे. हे अधिकार मार्च २०२८ पर्यंत असतील. या नव्या ८८ सामन्यांच्या वेळापत्रकात ऑस्ट्रेलियाविरुद्ध मायदेशातील सर्वाधिक २१ सामन्यांचा (पाच कसोटी, सहा एकदिवसीय आणि १० ट्वेन्टी-२०) समावेश आहे. त्यानंतर इंग्लंडविरुद्ध भारत १८ सामने (१० कसोटी, तीन एकदिवसीय आणि पाच ट्वेन्टी-२०) खेळणार आहे. यामध्ये एकूण २५ कसोटी, २७ एकदिवसीय आणि ३६ ट्वेन्टी-२० सामन्यांचा समावेश आहे.

गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत 'बीसीसीआय'ने 'स्टार इंडिया'कडून अंदाजे ६१३८ कोटी रुपये इतका महसूल मिळवला होता. यामध्ये आंतरराष्ट्रीय सामन्यांचे हक्क ६० कोटी रुपयांना विकले गेले होते. 'आयपीएल'मध्ये 'डिजिटल' आणि 'टीव्ही' अशा दोन्ही अधिकारांसाठी स्वतंत्र बोली लावण्यात आली. यामधून 'बीसीसीआय'ला ४८,३९० कोटी रुपये इतका महसूल मिळाला होता. हा बदल यशस्वी ठरल्यानंतर आता 'बीसीसीआय' आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या प्रसारण अधिकारांसाठी देखील स्वतंत्र बोली लावणार आहे. डिजिटल व्यवहारांना मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता भारतात डिजिटल अधिकार सर्वाधिक किमतीला विकले जातील, असे मानले जात आहे. टीव्ही ला मिळणारा प्रतिसाद तुलनेत कमी असेल असेही बोलले जात आहे.

सध्या तरी याबाबतची उत्सुकता लागून राहिलेली आहे.बीसीसीआयच्या या नव्या धोरणामुळे तिजोरीवर लक्ष्मीकृपा होणार आहे.शिवाय अन्य कंपन्यांही मालामाल होणार आहेत हे निश्चित.

..तर, झी देखील शर्यतीत

प्रसारण हक्कांच्या खरेदीत निविदांची १५ लाख रुपयांची कागदपत्रे तीन कंपन्यांनी खरेदी केली आहेत. यामध्ये डिस्ने-स्टार, रिलायन्स- वायकॉमम यांचा समावेश आहे. सप्टेंबपर्यंत सोनी आणि झी यांच्यात विलीनीकरणाचा करार पूर्ण झाल्यास 'झी' देखील यामध्ये उडी घेऊ शकते.

श्रेयस अय्यर संघात परतण्याची शक्यता

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

विश्वचषकाला अवघे काही दिवस उरले आहेत. मात्र या स्पर्धे पर्यंत स्टार फलंदाज श्रेयस अय्यर फिट होईल की नाही हे अद्याप निश्चित झालेले नाही. अय्यर विश्वचषकात खेळू शकणार नसल्याचा दावा काही अहवालांमध्ये करण्यात आला आहे. त्याचबरोबर विश्वचषकापर्यंत अय्यर तंदुरुस्त होईल, असे मानले जात आहे. आता संघाचा कर्णधार रोहित शर्मानेच अय्यरच्या दुखापतीवर मोठे वक्तव्य केले आहे. एका कार्यक्रमादरम्यान अय्यरबद्दल बोलताना रोहित म्हणाला की, श्रेयस अय्यर परतीच्या मार्गावर आहे. रोहितच्या वक्तव्यावरून काहीही स्पष्ट झाले नाही पण अय्यर पुन्हा फिटनेस मिळवू शकतो याचा अंदाज लावता येतो.

भारत दौऱ्यासाठी आयर्लंड संघ जाहीर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय संघ काही दिवसांत आयर्लंडच्या दौऱ्यासाठी सज्ज होणार आहे. या दौऱ्यात भारत आणि आयर्लंड यांच्यात टी-२० सामन्यांनी मालिका खेळवण्यात येणार आहे. या मालिकेसाठी भारताच्या कर्णधारपदी जसप्रीत बुमराची निवड करण्यात आली आहे. आता भारताविरुद्धच्या या मालिकेसाठी आयर्लंडच्या संघाची निवड करण्यात आली आहे.

आयर्लंडने १५ खेळाडूंचा संघ ज जाहीर केला. भारत आणि आयर्लंड यांच्यमध्ये १८ ऑगस्टपासून नियोजित तीन सामन्यांची टी २० मालिका सुरु होणार आहे. या आयर्लंडच्या संघात प्रामुख्याने अशा खेळाडूंचा समावेश आहे जे गेल्या महिन्यात यशस्वी विश्वचषक पात्रता मोहिमेचा भाग होते. पण लीन्स्टर लाइटनिंग आणि अष्टपैलू फिओन हँडला संघात पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. जूनमध्ये झिम्बाब्वेमध्ये झालेल्या मनगटाच्या दुखापतीतून बरे झालेल्या गॅरेथ डेलनीचे पुनरागमन आयर्लंडच्या संघासाठी महत्वाचे असेल.

स्कॉटलंडमधील अलिकडील पात्रता मोहीम पुढील जूनच्या ढ२० विश्वचषक स्पर्धेसाठी आमच्या धोरणात्मक नियोजनाचा पहिला टप्पा होता, अँड्रयू व्हाईट, आयर्लंड पुरुषांचे राष्ट्रीय निवडकर्ता म्हणाले.

आयर्लंडच्या निवड समितीचे अध्यक्ष अँड्रयू व्हाईट यावेळी म्हणाले की, आगामी टी-२० विश्वचषक पाहता या संघाची बांधणी आम्ही केली आहे. कारण या संघातील बरेच खेळाडू टी-२० विश्वचषकातही पाहायला मिळतील. संघातील खेळाडूंना एकत्रितपणे चांगला सराव मिळाला आणि दिग्गज संघांबरोबर खेळताना ज्या चुका होतील त्या सुधारण्यासाठी हे सामने आमच्यासाठी महत्वाचे ठरणार आहे. टी-२० विश्वचषकापूर्वी आम्ही १५ टी-२० सामने खेळणार आहोत. त्यामधील ही भारताची मालिका आमच्यासाठी महत्वाची असणार आहे.

आयर्लंडचा टी २०संघ: पॉल स्टर्लिंग (कर्णधार), अँड्रयू बालबर्नी, मार्क अडायर, रॉस अडायर, कर्टिस कॅम्फर, गॅरेथ डेलेनी, जॉर्ज डॉकरेल, फिओन हँड, जोश लिटल, बॅरी मॅककार्थी, हॅरी टेक्टर, लॉर्कन टकर, थिओ व्हॅन वोरकोम, बेन व्हाइट, क्रेग यंग.

दौऱ्यातील सामने

१८ ऑगस्ट: आयर्लंड विरुद्ध भारत – पहिला ढ२० सामना (स्थानिक वेळ दुपारी ३ वाजता) २० ऑगस्ट: आयर्लंड विरुद्ध भारत – दुसरी ढ२० सामना (स्थानिक वेळ दुपारी ३ वाजता) २३ ऑगस्ट: आयर्लंड विरुद्ध भारत – तिसरी ढ२० सामना (स्थानिक वेळ दुपारी ३ वाजता).

अंतिम लढतीत प्रणॉयचा पराभव

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

ऑस्ट्रेलिया ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत भारताच्या एचएस प्रणॉयला पराभव पत्करावा लागला. त्याच्याविरुद्ध चीनच्या वांग हॉंग यांगने तीन गेमच्या थ्रिलरचा सामना जिंकला. वांगकडून प्रणॉयला पराभव पत्करावा लागला. या सामन्यात वॉंगचे पूर्ण वर्चस्व होते. यानंतर दुसऱ्या गेममध्ये त्याने चांगले पुनरागमन केले. दुसरा गेम थ्रिलर होता आणि प्रणॉयने तो असा जिंकला. शेवटच्या गेममध्ये प्रणॉयने १९-१४ अशी आघाडी घेतली पण इथून संपूर्ण सामना फिरला.

विश्वचषकात पाकिस्तान भारताकडून सारखं का हरतं?

। इस्लामाबाद । वृत्तसंस्था ।

पाकिस्तानला वर्ल्डकप सामन्यांमध्ये सलग १२ वेळा भारताकडून पराभव सहन करावा लागला आहे. २०२१ च्या टी २० वर्ल्डकपमध्ये अखेर पाकिस्तानने १९९२ पासून सुरु असलेली पराभवाची मालिका अखेर खंडीत केली. पाकिस्तानने भारताला १० विकेट्सनी पराभूत केलं. मात्र २०२२ च्या टी २० वर्ल्डकपमध्ये पुन्हा एकदा भारताने पाकिस्तानला मात दिली. आता वनडे वर्ल्डकप २०२३ मध्ये हे दोन्ही संघ अहमदाबादमध्ये भिडणार आहेत. या पार्शभुमीवर पाकिस्तानचा माजी कर्णधार वकार युनूसने पाकिस्तान वर्ल्डकपमधील भारताविरूद्धचा सामना का हरतो याचे कारण सांगितल

पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज वकार म्हणाला की, मआमच्यावेळी दबाव एवढी मोठी गोष्ट नव्हती. आता दबाव जास्त वाटतोय. तुम्ही एखाद्या संघाविरूद्ध जेवढं कमी खेळाल. तेही एका मोठ्या संघाविरूद्ध तर त्या सामन्यात दबाव तर येतोच.फ मविशेषकरून भारत पाकिस्तान सामना असेल तर दबाव अधिक असतो. आमच्या काळात मात्र हा कमी होता कारण आम्ही सुरूवातीच्या काळात एकमेकांविरूद्ध खूप क्रिकेट खेळलो आहे. असे तो म्हणाला.

वकारने पाकिस्तान विश्वचषकामध्ये भारताकडून का हरतो यावर म्हणाला की, आम्ही भारताविरूद्ध चोक करत होतो. मी जसं सांगितलं तसं आम्ही त्या काळात दबाव चांगल्या पद्धतीने हाताळत होते. आमच्याकडे सामना

आमच्याकडे सामना जिंकून देणारे खेळाडू आहेत.

एकट्याच्या जीवावर सामना जिंकून देणाऱ्या खेळाडूंमध्ये बाबर आझम, शाहीन अफ्रिदी, फखर जमान या खेळाडूंचा समावेश आहे. इमाम देखील दमदार खेळी करतोय.

– वकार युनुस, माजी क्रिकेटर

पाकिस्तान विजेता कोण?

भारत आणि पाकिस्तान हे एकतर आशिया कप किंवा आयसीसी इव्हेंटमध्ये एकमेकांविरूद्ध खेळतात. २००३ च्या वर्ल्डकपमध्ये पाकिस्तानचा कर्णधार असलेल्या वकार युनूसने मान्य केलं की बाबर आझमच्या नेतृत्वाखालील संघ दबाव हातळण्यात यशस्वी ठरले. त्याने पाकिस्तानला सामना जिंकून देणाऱ्यांची चार नावे सांगितली.

पाकिस्तानी क्रिकेटपटूंच्या पगारात घसघशीत वाढ

सर्वोच्च खेळाडूंना चारपटीने वेतनवाढ

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने अखेर एक मोठा निर्णय घेतला. त्यांनी पाकिस्तानच्या काही सर्वोच्च क्रिकेटपटूंची पगारवाढ केली आहे. ही पगारवाढ तब्बल ४ पटीनं करण्यात आली आहे. पीसीबीनं केलेली ही पगारवाढ ऐतिहासिक ठरली आहे.ती पगारवाढ पाहून भारतीय संघातील गरिबी समोर आली आहे.

इएसपीएन क्रिकइन्फोने दिलेल्या माहितीनुसार पीसीबीचा वार्षिक करार हा जूनमध्ये संपला आहे. नव्या वर्षाचा करार करताना पीसीबीने आपल्या अ श्रेणीतील खेळाडूंना मिळणाऱ्या रक्कमेत मोठी वाढ केली आहे. पाकिस्तानच्या अ श्रेणीत तीन खेळाडूंची नावे आहेत. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम, स्टार फलंदाज मोहम्मद रिझवान आणि वेगवान गोलंदाज शाहीन अफ्रिदी यांचा या अ श्रेणीत समावेश आहे. या खेळाडूंना प्रत्येक महिन्याला जवळपास १५९०० डॉलर्स म्हणजे १३ लाख रूपये देण्यात येणार आहेत. (याचा अर्थ या सर्व अ श्रेणीतील खेळाडूंना आता वर्षाला १.५ कोटी रूपये मिळतील. यापूर्वी या सर्व खेळाडूंना प्रत्येक महिन्याला ४७०० डॉलर्स म्हणजे वर्षाला ४६ लाख रूपये मिळत होते.

इंग्लंडचे खेळाडू करोडपती

भारतीय संघातील ४ खेळाडू हे सर्वोच्च अ प्लस श्रेणीत आहेत. या ग्रेडमध्ये जे क्रिकेटपटू हे तीनही फॉरमॅटमध्ये खेळत असतात त्यांचा समावेश असतो. सध्याच्या करारानुसार अ प्लस श्रेणीत कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि अष्टपैलू खेळाडू रविंद्र जडेजा यांचा समावेश आहे. या श्रेणीतील खेळाडूला बीसीसीआय वर्षाला ७ कोटी रूपये देते. पाकिस्तानचे खेळाडू लखपती पासून करोडपती झाले आहेत. मात्र भारतीय क्रिकेटपटूंच्या तुलनेत ते खूप मागे आहेत. इंग्लंडचे खेळाडू हे पगाराच्या बाबतीत भारतीय खेळाडूंच्याही पुढे आहेत. त्यांच्या टॉप ग्रेडच्या खेळाडूंना वर्षाला जवळपास १० कोटी रूपये मिळतात.

हेल्सची निवृत्ती

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

एकेकाळी त्याच्यावर ड्रग्समुळे बंदी आली होती. या प्रकरणामुळे त्याला विश्वचषकात खेळता आले नव्हते. पण त्याने हार मानली नाही. या प्रकरणातून बाहेर आला. पुन्हा एकदा त्याने मेहनत घेतली. संघात पुन्हा एकदा तो परत आला. विश्वचषकासाठी मैदानात उतरला आणि आपल्या संघाला त्याने विश्वचषक जिंकवून दिला. पण आता तो चर्चेत आला आहे तो एका धक्कादायक गोष्टीमुळे. कारण आता त्याने अचानकपणे निवृत्ती घेत सर्वांनाच मोठा धक्का दिला आहे. ही गोष्ट आहे इंग्लंडचा धडाकेबाज फलंदाज ॲलेक्स हेल्सची.

ही गोष्ट आहे २०१९ सालची. क्रिकेट विश्वचषक ऐन तोंडावर आला होता. पण या विश्वचषकापूर्वी तो ड्रग्सच्या टेस्टमध्ये फेल झाला. त्यामुळे उत्तेजक सेवन केल्याप्रकरणी संघाबाहेर काढण्यात आले. आपल्या संघ सहकाऱ्यांना त्याने विश्वचषक खेळताना टीव्हीवरून पाहिले. पण तो हताश झाला नाही. उलट तो त्वेषाने पेटून उठला. त्यानंतर त्याने जोरदार मेहनत केली. त्यानंतर देशाच्या संघात स्थान मिळवले. २०२१ चा विश्वचषक आला होता. त्याने जोरदार तयारी केली आणि आपल्या संघाला विश्वचषक जिंकवून देण्यात त्याने मोलाची जबाबदारी पार पाडली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)